


गणपती बाप्पा मोरया

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | बुधवार, २७ ऑगस्ट २०२५ | वर्ष: १ | अंक:८६ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## अग्रलेख खरीखरी

### विघ्न हरा हो बाप्पा !

आज आपले महादैवत महा आराध्य श्रीगणेशाच्या आगमनाचा पहिला दिवस आहे. गणेश ही देवता प्राचीन काळापासून पूजनीय आहे. गणेशाच्या नावाने कितीतरी आख्याने आहेत कथा सुद्धा आहेत. महाराष्ट्र तर गणेश पूजक असा प्रदेश आहे. त्यातल्या त्यात आपल्या कोकणात आणि मुंबईत गणरायाचा दिमाख आणि रुबाब काही औरच असतो. १४ विद्या आणि ६४ कलांच्या या देवतेची पूजा संपूर्णपणे मनोभावे करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. बाळ गंगाधर म्हणजेच लोकमान्य टिळक यांनी देशात जनजागृतीसाठी शिवजन्मोत्सव आणि गणेश पूजन स्वातंत्र्यपूर्व काळात चालू केले होते. त्या काळाच्या आणि नंतरच्या अनेक वर्षांपर्यंत गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी या दहा तिथीमध्ये गणेशोत्सवाच्या काळात सर्वच गणेश भक्तांना बौद्धिक मेजवानी मिळत होती. गेल्या काही वर्षात मेजवानी तर सुरू आहे पण बुद्धीदाता गणेशाच्या बुद्धीचा प्रकाश भक्तांच्या डोक्यावरून जातोय की काय असे दिसून येत आहे. आपल्या देशातील राजेशाही तर कधीच लुप्त झालेली आहे. मुंबईत आता लालबागचा राजा, फोर्टचा राजा, अंधेरीचा राजा, गणेश गल्लीचा राजा असे प्रत्येक उपनगरातील वेगवेगळे राजे आजपासून विराजमान होतील. त्यामुळे मुंबईमध्ये अनेक राजे आहेत, फक्त राजगाद्या गेल्या आहेत तरी आपल्या या देवाची गादी कायम आहे. या गणेश भक्तीचा महाराष्ट्राला स्वाभिमान वाटणे साहजिकच आहे कारण या भक्तीसाठी आपण करोडो रुपये खर्च करतो. हे दहा दिवस अत्यंत मोठ्या इव्हेंटचे असतात. प्रसिद्ध राजांच्या दर्शनासाठी कितीतरी तास उभे राहण्याचा पराक्रम अनेक भक्तांनी केलेला आपण बघतो. सामान्य जनांच्या देवभक्तीचे हे उत्तम उदाहरण आहे. तरीही इतक्या भक्तीभाव संपन्न महाराष्ट्रावर दिवसेंदिवस संकटे का येत आहेत? हा प्रश्न आमच्या मनात वारंवार येतो कारण कधी मुसळधार पाऊस घडतो, कधी अपघातात अनेक माणसे मरतात, कधी दंगे धोपे होतात, कधी भरलेल्या शेतात शेतकऱ्यांच्या स्वप्नावर पाणी फिरवणारी आपत्ती येते तर कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांसाठी खड्डयांची शर्यत उभी राहते. यासह अनेक नको ते प्रकारही होत असेतात. नोंद घेण्याची गोष्ट म्हणजे या गणेशोत्सवाच्या काळात तर ध्वनी प्रदूषणाचा इतका काही विस्फोट होतो की त्यामुळे संपूर्ण धरती हादरून जाते. पण, हा पण जाणून घ्यावा... अशा या महामंगल सोहळ्यात जी धार्मिकता दिसली पाहिजे, जे मांगल्ये दिसले पाहिजे, जे पावित्र्य दिसले पाहिजे जी शांततापूर्ण श्रद्धा आणि साधना दिसली पाहिजे. ते कुठेतरी हरवल्याचे दिसत आहे आणि ते का दिसत आहे हे आम्हालाही कळत नाही. कदाचित हा आमच्या बुद्धीचा आवाका एवढा नसण्याचा हा परिणाम असावा. तेव्हा आता आपल्या सर्वांच्या लाडक्या आराध्य दैवताला गणेशाला करबद्ध प्रार्थना आहे की, बाप्पा मोरया या तुम्ही इथे या. महाराष्ट्र आणि देशातील सर्व संकटांचे निवारण करा हीच आमची तुमच्या चरणी नम्र विनंती आहे. गणपती बाप्पा आम्ही तुमच्यासमोर बालके आहोत. महाराष्ट्र आणि आपल्या भारत देशावर जितकी विघ्ने आहेत त्यांना बाजूला सारा, त्यांना हरा आणि खऱ्या अर्थाने लोकांचे राजे म्हणजेच गणराया व्हा. हा संपूर्ण महाराष्ट्र बरा करा. तुमच्या चरणी साष्टांग दंडवतासह आम्ही सादर आहोत. म्हणा, गणपती बाप्पा मोरया!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023




# हायकोर्टाच्या मनाईनंतरही जरांगे येणार

**मुंबई , दि. २६ प्रतिनिधी**

**मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्यास मुंबई उच्च न्यायालयाने मनाई केली आहे. दरम्यान, "आम्ही सुद्धा आमची बाजू उच्च न्यायालयात मांडू. आम्हाला मुंबईत आंदोलन करण्यास परवानगी मिळणारच," असा विश्वास जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला आहे. "मुंबई उच्च न्यायालयाने आझाद मैदानावरील आंदोलनास मनाई केली आहे. आम्ही आजपर्यंत नेहमीच न्यायदेवतेचा आदर केला आहे. मागील चार महिने आम्ही सरकारलाही या आंदोलबाबत माहिती देत आहोत. उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत आम्ही न्यायालयात दाद मागणार आहोत. आता मागे हटणार नाही. २९ ऑगस्टला मुंबईला जाणारच," असा निर्धारही जरांगे यांनी यावेळी व्यक्त केला.**



**न्यायालयाच्या निर्णयाचा आदर**

आम्हाला आझाद मैदानात आंदोलन करण्यास परवानगी का नाकारली? आंदोलनच करू नका, असं न्यायालय म्हणू शकत नाही. आम्ही न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान करतो. मात्र नियम आणि अटींच्या आधारे आम्हाला आंदोलन करण्यास न्यायालय परवानगी देईल, असा विश्वासही जरांगेंनी व्यक्त केला. आझाद मैदानावर आंदोलन करण्यास न्यायालयाने मनाई केली आहे. आम्ही या निर्णयाविरोधात न्यायालयात दाद मागू. न्यायालय आमच्या मागणीचा नक्कीच विचार करेल, असे जरांगे म्हणाले.

यावेळी जरांगे म्हणाले की, आम्ही अडचण येऊ नये म्हणून शहरातून ही जाणार नाहीत. आम्ही मधून कुठे गेलो तर अडथळा आणतोय याचा अर्थ होतो. आझाद मैदानावर मिरवणूक येत नाहीत. त्यामुळे आम्हाला तुम्ही संध्याकाळपर्यंत रस्ता सांगितला तरी काही अडचण नाही. ५८ लाख नोंदींचा अहवाल दिला. आता आरक्षण द्यायला काय हरकत आहे. आजच अंमलबजावणी करा कशाला रॉड मॅप टाकायला लावता, असे आवाहन जरांगे यांनी केले. तर आता माझ्या हातात काही राहिले नाही. मी थोड्या दिवसाचा पाहुणा असल्याचे भावनिक उद्गार त्यांनी काढले. तुम्ही साक्षीदार आहेत, मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी सुरेश धस यांना पाठवले होते. समाज शांततेत येणार आहे. उलट तुम्ही सेवा करायला पाहिजे. संध्याकाळ पर्यंत आमच्या मागण्यांची अंमलबजावणी करा, अशी मागणी जरांगे यांनी केली.

**मुख्यमंत्र्यांचे ओएसडी साबळे यांनी घेतली जरांगेंची भेट**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे पाटील यांनी उद्या मुंबईच्या दिशेने कूच करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार ते उद्या सकाळी १० वा. आपल्या लाखो समर्थकांसह मुंबईच्या दिशेने रवाना होणार होते. मुंबईतील आझाद मैदानावर ते उपोषण करणार होते. याच अनुषंगाने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे स्वीय-सहाय्यक राजेंद्र साबळे यांनी अंतरवाली सराटीमध्ये जाऊन जरांगे पाटील यांची थेट भेट घेतली. दरम्यान, मुख्यमंत्र्याचे ओएसडी साबळे यांनी यावेळी फार बोलण्यास नकार दिला. "दादा, तुम्ही आम्हाला मॅप द्या, मी मुख्यमंत्री यांच्याकडे निरोप देईल." एवढेच साबळे चर्चेच्या दरम्यान म्हणाले. तसेच माध्यमांसोबत बोलताना साबळे यांनी, मी केवळ मनोज जरांगे पाटील यांच्याकडून त्यांच्या मोर्चाचा मार्ग जाणून घ्यायला आलो होतो. त्यांची यासंदर्भात काय अडचण आहे, हे जाणून घेण्यासाठी मी इथे आलो होतो, अशी प्रतिक्रिया दिली.

# राज्यातील कामगार कायद्यांत सुधारणा करण्यास मंजुरी

**मुंबई , दि. २६ प्रतिनिधी**

प्रत्येक आठवड्याच्या मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडते. त्याच पार्श्वभूमीवर मंगळवारी राज्य मंत्रिमंडळांची बैठक पार पडली. या बैठकीत एकूण आज ९निर्णय घेण्यात आले. यामध्ये सहकार विभागातील दोन, कामगार विभागातील एक, सार्वजनिक बांधकाम विभागातील एक, विधि व न्याय विभागातील दोन, इतर मागास बहुजन कल्याण विभागातील एक, जलसंपदा विभागातील एक आणि महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील एक निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.



**जलसंपदा विभाग :** बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव , ब्रम्हनाथ येळंब (ता. शिरुर (का) टाकळगाव (हिंगणी) (ता. गेवराई) या तीन कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचा विस्तार व बॅरेजमध्ये रुपांतरण करण्याच्या कामास मान्यता

**कामगार विभाग:** राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्यास मान्यता.

**सहकार विभाग:** पुणे जिल्ह्यातील राजगड सहकारी साखर कारखाना लि. अनंतनगर निगडे, (ता. भोर) या साखर कारखान्यास राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून खेळत्या भांडवलासाठी घेण्यात येणाऱ्या मार्जिन मनी कर्जास मंजुरी तसेच संघर्षयोद्धा बबनराव ढाकणे केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लि. सुमननगर, ता शेवगाव, अहिल्यानगर या साखर कारखान्यास महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून मुदती कर्ज शासन हमीवर उपलब्ध करून देण्यास मान्यता

**सहकार विभाग:** पुणे जिल्ह्यातील यशवंत सहकारी साखर कारखाना लि. चिंतामणीनगर, मु. पो. थेऊर (ता. हवेली) या कारखान्याच्या जमीन विक्रीस मान्यता.

**सार्वजनिक बांधकाम विभाग:** नागपूर गोंदिया प्रवेश द्रुतगती महामार्ग प्रकल्पास मान्यता, प्रकल्प महामंडळामार्फत हाती घेण्यास, प्रकल्पाच्या आखणीस व भूसंपादनाकरीता मान्यता.

**विधि व न्याय विभाग:** बीड जिल्ह्यात आष्टी येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय स्थापन होणार त्यानुषंगाने न्यायीक अधिकारी व कर्मचारीवृंद यांची पदे निर्मिती व या न्यायालयासाठी येणा-या खर्चास मान्यता. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास मान्यता.

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग :** विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याची कार्यपद्धती प्रभावीरित्या राबविणार.

**महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग:** नागपूर व अमरावती विभागातील निवासी वापरासाठी लिलावाव्दारे-प्रिमियम अथवा अन्य प्रकारे भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी बाबत विशेष योजनेला आणखी एक वर्षाकरिता मुदतवाढ

# शिंदे समितीस मुदतवाढ

**मुंबई , दि. २६ प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाची घेतलेली भूमिका यामुळे राज्यातील वातावरण पुन्हा एकदा ढवळून निघाले आहे. जरांगे येत्या २९ ऑगस्ट रोजी मुंबईत येऊन हे उपोषण चालू करणार आहेत. मात्र न्यायालयाने त्यांना मुंबईत येण्यास मनाई केल्यानंतर वातावरण जास्तच तापले आहे. असे असतानाच आता समोर मोठी माहिती समोर आली आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मराठा आरक्षण आणि त्यासाठी चालू असलेल्या प्रक्रियेबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयांबाबत मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी माहिती दिली आहे.

मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक पार पडल्यानंतर राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी बोलताना, मनोज जरांगे यांनी हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटमधील नोंदीनुसार आम्हाला ओबीसी प्रमाणपत्र मिळावे, अशी मागणी जरांगे यांची आहे. याबाबत आजच्या बैठकीत चर्चा झाली. कायदेशीर प्रक्रिया चालू आहेत. हैदराबाद गॅझेटच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी न्यायमूर्ती शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीस मुदतवाढ द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. या समितीला आता आणखी सहा महिने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे हैदराबादच्या गॅझेटचा अभ्यास करून त्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल. कारण ही प्रक्रिया क्लिष्ट आहे. जरांगे यांनीच केलेल्या मागणीनुसार शिंदे समितीला मुदतावाढ देण्यात आली आहे, असे राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.

# बाजारासाठी 'अ'मंगळवार!

## सेन्सेक्स ८४९ अंकांनी कोसळला

**मुंबई, दि. २६ प्रतिनिधी**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या अतिरिक्त टॅरिफ लादण्याच्या घोषणेने भारतीय शेअर बाजारात निराशा पसरली. मंगळवारचे सत्र बाजारासाठी 'अमंगल' ठरले. आठवड्याच्या दुसऱ्याच दिवशी बाजारात मोठी घसरण होऊन तो लाल निशाणीवर बंद झाला. आजचा दिवस सेन्सेक्सच्या मासिक एक्सपायरीचाही होता, ज्यात निफ्टी आणि सेन्सेक्स दोन्ही सुमारे १% घसरणीसह बंद झाले. या घसरणीचा सर्वाधिक फटका मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्सना बसला. निफ्टी बँक इंडेक्स सुमारे १.३% घसरून १५ मे २०२५ नंतरच्या सर्वात खालच्या पातळीवर बंद झाला. एफएमसीजी इंडेक्स वगळता इतर सर्व क्षेत्रांमध्ये विक्रीचा जोरदार दबाव दिसून आला.



रिअल्टी, डिफेन्स आणि पीएसई शेअर्समध्ये सर्वाधिक विक्री झाली. तर मेटल, फार्मा आणि ऑइल अँड गॅस इंडेक्समध्ये १.५% पेक्षा जास्त घसरण झाली. अमेरिकेच्या संभाव्य टॅरिफमुळे बाजारात नकारात्मक वातावरण निर्माण झाले, ज्यामुळे बाजारात सर्वत्र विक्रीचा दबाव दिसला. गेल्या तीन महिन्यांतील बाजारातील ही सर्वात मोठी एकदिवसीय विक्री आहे. निफ्टी ५० मधील ४० शेअर्स लाल निशाणीवर बंद झाले.

मंगळवारच्या सत्राच्या अखेरीस, सेन्सेक्स ८४९ अंकांनी घसरून ८०,७८७ च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी २५६ अंकांनी घसरून २४,७१२ वर, तर निफ्टी बँक इंडेक्स ६८९ अंकांनी घसरून ५४,४५० च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी मिडकॅप इंडेक्स ९३५ अंकांनी घसरून ५६,७६६ च्या पातळीवर बंद झाला.

# जगातील अनेक देशांमध्ये 'EV' चालतील त्यावर लिहिलेले असेल मेड इन इंडिया'-पंतप्रधान

**नवी दिल्ली, दि. २६ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (दि. २६) अहमदाबाद येथे मारुती सुझुकीच्या इलेक्ट्रिक कार आणि बॅटरी उत्पादन प्रकल्पाचे (मॅन्युफॅक्चरिंग प्लांट) उद्घाटन केले. या प्रकल्पामध्ये हायब्रीड बॅटरी इलेक्ट्रोड्सचे उत्पादन केले जाणार आहे. याशिवाय, मारुती सुझुकीची पहिली जागतिक बॅटरी इलेक्ट्रिक वाहन (BEV), 'ई-व्हिटारा' (e VITARA), ही जपान आणि अनेक युरोपीय राष्ट्रांसह १०० हून अधिक देशांमध्ये निर्यात केली जाणार आहे. आता जगातील अनेक देशांमध्ये ज्या ईव्ही चालतील, त्यावर लिहिलेले असेल - मेड इन इंडिया, असे प्रतिपादन या वेळी पंतप्रधान मोदी यांनी केले.



या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, 'गणेशोत्सवाच्या उत्साहात आज भारताच्या 'मेक इन इंडिया' यात्रेत एक नवीन अध्याय जोडला जात आहे. मेक इन इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड हे आमच्या त्या ध्येयाच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. आजपासून भारतात बनवलेली इलेक्ट्रिक वाहने १०० देशांना निर्यात केली जातील. तसेच, आज हायब्रीड बॅटरी इलेक्ट्रोड निर्मितीलाही सुरुवात होत आहे.'

**भारत-जपान मैत्रीचे नवे पर्व**

आजचा दिवस भारत आणि जपानच्या मैत्रीलाही एक नवे पर्व सुरु झाले आहे. मी सर्व देशवासियांना, जपान आणि सुझुकी कंपनीला खूप खूप शुभेच्छा देतो. भारताच्या यशोगाथेची बीजे सुमारे १३ वर्षांपूर्वी पेरली गेली होती. २०१२ मध्ये जेव्हा मी गुजरातचा मुख्यमंत्री होतो, तेव्हा मी मारुती सुझुकीला हंसलपूरमध्ये जमीन दिली होती. तेव्हाही दृष्टी आत्मनिर्भर भारताची होती, मेक इन इंडियाची होती. आमचे तेव्हाचे प्रयत्न आज देशाचे संकल्प पूर्ण करण्यात इतकी मोठी भूमिका बजावत आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, 'भारताकडे लोकशाहीची शक्ती आहे. भारताकडे लोकसंख्येचा सकारात्मक घटक आहे. आमच्याकडे कुशल मनुष्यबळाचा खूप मोठा साठा आहे. त्यामुळे ही आमच्या प्रत्येक सहकाऱ्यासाठी विन-विन सिच्युएशन म्हणजेच दोघांसाठीही फायद्याची स्थिती निर्माण करते. आज सुझुकी जपान भारतात उत्पादन करत आहे, आणि येथे बनवलेल्या गाड्या पुन्हा जपानला निर्यात केल्या जात आहेत. हे भारत आणि जपानच्या संबंधांच्या मजबुतीचे प्रतीक तर आहेच, शिवाय भारताविषयीच्या जागतिक विश्वासालाही दर्शवते.' गुजरात येथील टीडीएस लिथियम-आयन बॅटरी प्लांटमध्ये हायब्रीड बॅटरी इलेक्ट्रोडच्या स्थानिक उत्पादन प्लांट तोशिबा, डेन्सो आणि सुझुकी यांचा संयुक्त उपक्रम आहे. सुझुकी मोटर कॉर्पोरेशनचे अध्यक्ष आणि प्रतिनिधी संचालक तोशिहिरो सुझुकी आणि गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल हे देखील उपस्थित होते.



# मी गणपती बोलतोय...


'बाळा गणेशा उठ! अरे तुला आज पृथ्वीवर जायचे ना! सारे भक्त तुझी चातकासारखी वाट पाहत असतील. उशीर करू नकोस. बघ आम्ही सारी तयारी करून ठेवली आहे. अवघा कैलास पर्वत परिवार तुला निरोप देण्यासाठी सज्ज झाला आहे. तुझे पिताश्री भगवान महादेव तुला कैलास पर्वताच्या सीमेपर्यंत सोडण्यासाठी येणार आहेत. चल उठ बरं! तुझ्यासाठी बघ मी कपिला गायीच्या शुद्ध तुपातले मोदक बनविले आहेत आणि हो! अरे, तुझे वाहन असलेला मूषकराजही अद्याप कैलासी हजर झालेला नाही. अरे, माणसासारखी काय रे तुम्ही वागतायेत! मला नाही खपायचं हं! असा लटका राग व्यक्त करीत माता पार्वती माजघराकडे वळाली...'

एव्हाना श्रीगणेश झोपेतून खडखडीत जागे झाले होते. ढगांचा बिछाना आणि चांदण्याची दुलई बाजूला सारून ते उठून बसले. अरे गणेशा उठ! वाट पाही रमा... रामप्रहरी ईशस्तवन करा... माता पार्वतीचे पुन्हा पालुपद सुरू झाल्याने श्रीगणेश थोड्या नाराजीनेच उठले; पण माता पार्वतीजवळ जाऊन त्यांनी बैठक मारली आणि ते फुरंगूटून बसले. अरे गणेशा बाळा! काय झालं? अरे आजपासून तुझा उत्सव सुरू होतंय. अवघी पृथ्वी तुझ्या आगमनासाठी सज्ज झाली आहे. सारे भक्त तुझ्या नावाने जयघोष करतायेत आणि तू असा चेहरा उतरवून बसला आहेस. चल उठ! स्नानादी आटोप, असे म्हणत पार्वती मातेने गणेशाला उठविले.

"आम्ही नाही जा!" मला नाही जायचं त्या पृथ्वीतलावर. मला काय काय यातना सहन कराव्या लागतात तुला काय माहीत! श्रीगणेश लाडीक हट्टाने बोलले. तशी माता पार्वती सावरून बसली.

गणेशाच्या हाती गरमागरम मोदकांची थाळी देऊन त्याला छातीशी ओढून म्हणाली, अरे बाळा गणेशा! काय सांगतोयस तू! अरे, भूतलावर तुझा एवढा जयजयकार होतो. तुझ्या भक्तीत आबालवृद्ध तल्लीन होतात. धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तुला पंचपक्वान्ने, फळफळावळ, सुकामेवा, मोदकांचे नैवेद्य दाखविले जातात. तुझ्या आगमनात भक्त बेधुंद होऊन नाचतात. तुला निरोप देतानाही ते नाचतात; पण त्यावेळी त्यांचा उर तुझ्या जाण्याने दाटलेला असतो. अरे, स्वर्गातील साऱ्या देव-देवतांनाही तुझा हेवा वाटतो आणि तू पृथ्वीवर जायला नकार देतो आहेस! या सर्व गोष्टींना तू यातना म्हणतो. अरे बाळा गणेशा! तू साऱ्यांचा बाप्पा आहेस. विघ्नहर्ता आहेस. मांगल्याचा ठेवा आहेस. बघ जरा खाली बघ! सारे भक्त तुझ्या आगमनासाठी कसे आनंदाने भारावले आहेत. गणेश आराधण्याची सुंदर कवन कानांना कशी तृप्त करीत आहेत. तुझा पृथ्वीवर होणारे कोडकौतुक आम्ही कैलासावरून बघणार आहोत. चल बाळा आटोप लवकर. तुझी पृथ्वीगमनाची वेळ झालीय. माता पार्वतीने श्रीगणेशाला आपल्या कुशीतून दूर केलं. तसे श्रीगणेश रडू लागले. स्फुंदत स्फुंदत ते आपली व्यथा मातेला सांगू लागले. माते! ज्याचं दुखतं त्यालाच कळतं. तुम्हाला काय त्याचं! एरवी ते नारदकाका कैलास पर्वतावर येऊन नेहमी भगवान महादेवांना पृथ्वीवरची खडाण खडा माहिती देतात. त्यांना माहिती नाही का माझी व्यथा! हवं तर त्यांना विचार ना, गणेशोत्सवात माझे काय हाल होतात ते. माझे वाहन असलेला तो मूष राजही पृथ्वीवर यायला तयार नाही. माझ्या भक्तांसाठी गणेशोत्सव असतो; पण माझ्यासाठी तो जणू शिक्षाच आहे. पहिली पाच पंचवीस वर्षे मलाही खूप आनंद वाटायचा पृथ्वीवर जायला; पण माते हल्ली हिम्मतच होत नाही गं! माझ्या नावाखाली माझी भक्त मंडळी काय काय उद्योग करतात काय सांगू! एकदा मला आणून एका जागेवर बसून दिलं की मग विसर्जनाच्या दिवसापर्यंत माझे भक्त फटकत देखील नाहीत. सकाळची आरती झाली तर ठिक नाहीतर ही मंडळी थेट संध्याकाळीच हजर होतात. रात्रीची आरती म्हणजे पूर्ती डोकेदुखी असते. कानठळ्या बसविणारा नव्हे तर कानाचे पडदे फाडणारा कर्णकर्कश असा डीजे साउंडचा आवाज मस्तक बधिर करतो. बेंबीच्या देठापासून ओरडून गायलेली गीते ध्वनिक्षेपणावर दिवसभर वाजत असतात. माझी प्रतिष्ठापना सार्वजनिक मंडळाचे कार्यकर्ते उत्साहाने करतात; पण एका कोपऱ्यात मला बसवून दिले जाते. एवढ्या मोठ्या मंडपात मी गुपचूप बसलेला असतो. विविध देखावे, आरास याकडेच साऱ्यांचे लक्ष असते. जिथे पहावे तिथे गर्दीच गर्दी! गणपती बघायला म्हणून सारे आबालवृद्ध बाहेर पडतात. माझ्याकडे कोणी बघतच नाही. सर्वांचे लक्ष देखाव्याकडे असते. गल्लोगल्ली देखावे, आरास पाहत भटकायचं. खाद्यपदार्थावर ताव मारायचा. जत्रेची मजा लुटायची. कार्यक्रम बघायचे आणि घराकडे परतायचे, असा नागरिकांचा कार्यक्रम ठरलेला असतो. गर्दीत रेटारेटी करणाऱ्या उत्साही तरुणांचे प्रकार डोळ्यांना बघवत नाही. गर्दीत वावरणारे भामटे खिसे कापण्याचे, दागिने पळविण्याचे, लोकांच्या लेकीबालींना छेडण्याचे सर्रास प्रकार करतात.त्यातच भरीत भर म्हणून वाहनांची गर्दी, मिनिटा-मिनिटाला जाम होणारी ट्रॅफिक यामुळे गडबड गोंधळ उडतो. गणेश मंडळाचे कार्यकर्ते माझ्या नावाने वर्गणी गोळा करून हा उत्सव साजरा करतात. उरलेल्या भरमसाठ वर्गणीच्या पैशात कार्यकर्ते मोजमजा करतात. गणेशोत्सवात अनेक अवैध धंद्यांना ऊत येतो. राजकारणी मंडळी तर माझ्या नावाने हवे तसे राजकारण करतात. मिसरूड न फुटलेली पोरं नेता बनायची स्वप्न बघतात. दादाभाई मंडळींची तर या दिवसात चलतीच असते. माझ्या महिला-युवती भक्तांना निडरपणे बाहेर पडण्याची सोय नसते. सामान्य माणसांना वर्गणीसाठी अक्षरशः वेठीस धरले जाते. माझा उत्सव आणि हाणामाऱ्या हे जणू समीकरणच झालं आहे. पोलिसांना कायदा सुव्यवस्था धोक्यात येण्याची धास्ती असल्याने ते चोर सोडून संन्याशाला फाशी याप्रमाणे बिचाऱ्या निरुपद्रवी सामान्यांना वेठीस धरतात. ध्वनिप्रदूषण तर एवढे होते की गणेशोत्सव संपवून कैलासावर परतल्यावर बरेच दिवस कान बधिर झाल्यासारखे वाटतात. जलप्रदूषण, वायू प्रदूषणही होतं हे वेगळं सांगायला नको! त्यातच अंधश्रद्धा निर्मूलन समिती वाले आणि कट्टर हिंदुत्ववादी यांच्यात नेहमीप्रमाणे जुंपते. एक म्हणतो गणपती बुडवा तर दुसरा म्हणतो गणपती आम्हाला दान करा. माते निरोप देताना तर ही भक्त मंडळी अक्षरशः बेभान झालेली असतात. माझ्या आगमनाप्रित्यर्थ नसतो एवढा उत्साह, निरोप विसर्जनप्रसंगी मला दिसतो. प्रत्येक भक्त माझ्यापुढे येऊन नाचतो. माझे विसर्जन करताना माझे काय हाल होतात हे कोणी पाहत नाही. पाण्यात फेकतात काय, उलटे धरतात काय, नको ते प्रकार करतात! अनेक मूर्तीची विटंबना होते; पण कुणाचे लक्ष नसते. गणेशोत्सवानंतर विसर्जनस्थळी माझ्या मूर्तीचे अवशेष पाहायला मिळतात; पण याचे कुणाला सोयरेसुतक नाही. सांग ना माते सांग! किती यातना मी सहन करायच्या? देव झालो म्हणून काय झाले. मलाही भावना आहेत की नाही! तो विचारा मूषकराज फक्त या सर्व गोष्टींचा साक्षीदार आहे. माझा श्रीगणेश भक्तांच्या गराडात सापडला आहे, असे कोणी म्हणत नाही. माते नको मला ते देवपण! नको ते बाप्पापण! की विघ्नहर्ताची भूमिका! असे म्हणत श्रीगणेश पार्वती मातेच्या कुशीत स्फुंदत स्फुंदत शिरले. तसे मातेचेही डोळे भरून आले. ओघळणारी आसवे डोळ्यांच्या कडात लपवित ती माऊली श्रीगणेशाला म्हणाली, बाळा गणेशा तू म्हणतोस ते सत्य आहे रे; पण तूच या विश्वाचा तारणहार, विघ्नहर्ता आहेस. तुला कसं यापासून पाठ राखून पडता येईल? अरे, सर्वच भक्त तसे नसतात. त्यांच्यासाठी तरी जा बाळा पृथ्वीवर! ते बघ तुझी प्रतीक्षा करतायेत अन तो बघ तुझे वाहन मूषकराजे आले. श्री गणेशाने मुषकाकडे एकवार पाहिले आणि म्हणाले, हो माते! मला जायलाच हवे. शेवटी कितीही केलं तरी ती माझी भक्तमंडळीच! नाही का...







प्रासंगिक

दीपक भावसार

८३२९४६०२३०

## महत्त्वाचे

### होम मिनिस्टर माधवी घरटे ठरल्या पैठणी विजेत्या

**नाशिक ।** अत्यंत चुरशीच्या आणि उत्साहात रंगलेल्या होम मिनिस्टर स्पर्धेत माधवी घरटे पैठणी विजेत्या ठरल्या. उपविजेतीचा मान श्रीमती माने यांनी पटकावला. मान्यवरांच्या हस्ते जल्लोषात पारितोषिक वितरण सोहळा संपन्न



झाला.ढोलताश्यांच्या गजरात विजेत्यांना पैठणी देण्यात आल्या. महिलांसाठी खास होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यात अनेक नाशिककर महिला,भगिनींना विनामूल्य सहभागी होण्याची संधी मिळाली. अफलातून म्युझिक लव्हर्सचे प्रमुख हरीशभाई ठक्कर आयोजित व संतोष फासाटे प्रस्तुत या कार्यक्रमात महिलांसाठी धमाल, मस्ती आणि बक्षिसांचा वर्षाव करण्यात आला. काल सायंकाळी ५ वाजता नभांगण सभागृह, वडाळा पाथर्डी रोड, इंदिरानगर, नाशिक येथे हा सोहळा झाला. यावेळी लाडके भाऊजी संतोष फासाटे यांनी विविध खेळ घेतले. वहिनींचा हटके उखाणा, नृत्य स्पर्धा, मजेशीर संवाद, हशा आणि आनंदाचा वर्षाव झाला. विविध स्पर्धांमध्ये कविता फेगडे, सायली महाजन, वैशाली पाटील, सरिता परदेशी, स्विटी सोनवणे, वंदना कोठावदे, कमल जाधव, पूनम शिंदे, निशा खरविंदकर, आशा अरसुले, सुरेखा आहेर, प्रियांका महाले यांना पारितोषिके देण्यात आली. यावेळी सादर झालेल्या धमाकेदार गाण्यांना जयेश भालेराव, सुवर्णा भालेराव व सहकाऱ्यांनी सुरेल साथसंगत केली. ध्वनी व्यवस्था सचिन तिडके यांनी सांभाळली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश गोसावी, गिरीश ठक्कर, अनिल पोटे, संतोष देहुकर, राजेंद्र पवार यांनी परिश्रम घेतले.

### साईराज परदेशी, तृप्ती पाराशर यांची भारतीय संघात निवड

**मनमाड ।** आंतरराष्ट्रीय खेळाडू साईराज परदेशी याची सलग सहव्या वेळेस भारतीय संघात निवड करण्यात आली असून अहमदाबाद येथे २४ ते ३० ऑगस्ट २०२५ दरम्यान होणाऱ्या कॉमनवेल्थ चैम्पियनशिप या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी ८८ किलो वजनी गटात साईराज राजेश परदेशी हा भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. महाराष्ट्रातील एकमेव आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तृप्ती शेखर पाराशर हिची भारतीय संघाच्या प्रशिक्षक पदी नियुक्ती करण्यात आली असून तृप्ती ची ही सलग नववी आंतरराष्ट्रीय स्पर्धा आहे. मनमाड सारख्या छोट्या शहरातील खेळाडू व प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत आहेत ही समस्त मनमाड करांसाठी अभिमानाची बाब आहे भारताचे पंतप्रधान यांनी आपल्या मन की बात या कार्यक्रमात साईराजचा गौरव केला होता. साईराज पुन्हा एकदा आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतासाठी पदक मिळवून देण्यासाठी सज्ज झाला आहे.साईराज परदेशीला वेटलिफ्टिंग प्रशिक्षक प्रवीण व्यवहारे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तृप्ती पाराशर भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे आलोकेश बरवा,डी.डी.शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले आहे.





# आरोग्य विद्यापीठात 'संगम-२०२५' आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप

## संशोधन व तंत्रज्ञानाच्या व्यापकतेसाठी व्यासपीठ गरजेचे : कुलगुरु कानिटकर

**नाशिक ।** आरोग्य क्षेत्रात संशोधन व तंत्रज्ञानाला अधिक व्यापकता मिळण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करुन देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन कुलगुरु लेपटनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) यांनी केले.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व आय.आय.टी. बॉम्बे, टोकोमी फेलो यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'संगम-२०२५' आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप समारंभ संपन्न झाला. यावेळी माजी मुख्यसचिव सुजाता सौनिक, कुलगुरु लेपटनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त), आय.आय.टी. बॉम्बेचे प्राध्यापक सतीश अग्निहोत्री, प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी कुलगुरु कानिटकर (निवृत्त) यांनी सांगितले की, आरोग्य क्षेत्रात संशोधनाला मोठया प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. कृत्रिम बुध्दीमत्ता व तंत्रज्ञानाचा वापर करुन मोठया प्रमाणात कार्य करता येईल. विविध संस्था, कंपनी व विविध सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने संशोधन प्रकल्प प्रभावीपणे मांडता येतील. यासाठी निधी उपलब्ध करुन देणे व त्यासाठी नेटवर्किंग सुविधा असणे गरजेचे आहे. 'संगम-२०२५' च्या माध्यमातून विविध विषयावरील तज्ज्ञांनी सहभाग घेतला. यामध्ये शोधनिबंधाचे सादरीकरण, पोस्टर प्रेझेंटेशन व स्पर्धेच्या माध्यमातून संशोधकांना वाव मिळाला आहे. आरोग्य व तंत्रज्ञानाच्या नवीन वाटा खुल्या आहेत. कृत्रिम बुध्दीमत्ता व हेल्थ टेक्नोलॉजीचा वापर करुन अधिक सक्षमपणे काम करणे शक्य होईल. आरोग्य विद्यापीठ आणि आय.आय.टी. बॉम्बेच्या संगमातून हा उपक्रम अधिक प्रभावी ठरला असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विद्यापीठाचे मा. प्रति-कुलगुरु डॉ.मिलिंद निकुंभ यांनी सांगितले की, 'संमग-२०२५' करीता विविध देशातून संशोधकांनी केलेले सादरीकरण उत्कृष्ट होते. विजेत्यांची निवड करणे परीक्षकांसाठी एक मोठे आव्हान होते कारण प्रत्येक सादरीकरण दर्जेदार होते. या स्पर्धेतून अनेक नवीन कल्पनांना आणि युवा नेतृत्वाला प्रोत्साहन मिळेल. विविध देशातील, राज्यातील संशोधक, उद्योजक व तज्ज्ञांच्या सहभागाने या परिषेदेला मुर्त रुप आले. तंत्रज्ञान, आरोग्यसेवा आणि डिजिटल हेल्थ केअरसाठी ही परिषद दिशादर्शक ठरेल असे त्यांनी सांगितले.यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी सांगितले की, गेल्या



तीन दिवसांपासून विद्यापीठात आरोग्य सेवा क्षेत्रातील नवनवीन धोरणे, तंत्रज्ञान आणि भविष्यातील दिशा मोठया प्रमाणात मंथन झाले. आरोग्य क्षेत्रातील धोरणर्निमितीसाठी ते अत्यंत महत्वपूर्ण असणार आहे. संगम हे केवळ वैचारिक देवाणघेवाणीची परिषद नसून तो एक अविस्मरणीय अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि आय.आय.टी. बॉम्बे यांच्यात 'संगम' च्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्राध्यापक कर्नल डॉ. कारभारी काळे उपस्थित होते. आरोग्य शिक्षणात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींचा विद्यापीठाकडून जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. सन २०२४-२५ चा विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार डॉ. जया कुरुविल्ला यांना देण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरवार्थींना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या परिषदेत हेल्थ महाकुंभ, जेरिऑट्रीक केअर व मेंटल हेल्थ आदी विषयांवर घेण्यात आलेल्या 'दिशा हॅकेथॉन' स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्या होलोहेल्थ टीमला रुपये पंचवीस हजार रकमेचा धनादेश सुपुर्द करण्यात आला. व्दितीय क्रमांक विजेता इलिक्झायर टीमला रुपये वीस हजार रकमेचा धनादेश तसेच तृतीय क्रमांक विजेता फिटमेड टीमला रुपये पंधरा हजार रकमेचा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे 'चक्र' कंपनीचे बोधचिन्ह क्रियेटर कु. मृण्ययी गुरखेचा कुलगुरु यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या परिषदेच्या समारोप समारंभात जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी सूत्रसंचालन केले. 'संगम-२०२५' आंतरराष्ट्रीय परिषदेचे सुयोग्य नियोजन व कामकाजाबाबत डॉ. अशोक वानकुंद्रे व मेजर डॉ. लिनू यांनी प्रतिनिधी म्हणून सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. महेंद्र पटाईत, डॉ. सुप्रिया पालवे, डॉ. सुनिता संकलेचा, डॉ. सपना शिंदे, डॉ. स्नेहा धारणे, करिश्मा भंडारी, प्राध्यापक वामसी यांनी विशेष प्रयत्न केले तसेच सायंटिफिक सेशनकरीता डॉ. दुहिता कोडरे यांनी परिश्रम घेतले. यावेळी आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, संशोधक, अभ्यागत, अधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# सीमा काळे यांची ध्वजनिधीस एक लाख रुपयांची मदत

**नाशिक ।** विभागीय आयुक्त कार्यालयातील निवृत्त नायब तहसीलदार सीमा प्रमोद काळे, देहाडराय यांनी ध्वजनिधीस एक लाख रुपयांची मदत दिली आहे. या मदतीचा धनादेश त्यांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना सुपूर्द केला.

या निधीच्या माध्यमातून शहिदांच्या विधवा, अवलंबितांच्या पुनवर्सनासाठी मदत होणार आहे. याबद्दल जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी श्रीमती काळे यांचे आभार मानले. तसेच अन्य नागरिकांनीही ध्वजदिन निधीला मदत करावी, असे आवाहन केले. यावेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्ट. कर्नल विलास सोनवणे (नि.) उपस्थित होते.



# क्षमा याचनेतून आत्मशुद्धीचा मार्ग

जैन धर्मातील पर्युषण पर्व हा संयम, साधना आणि आत्मपरीक्षणाचा सोहळा आहे. या पर्वाचा शेवट 'क्षमापना' यादिवशी होतो. "मिच्छामी दुक्कडम्" या भावनेतून एकमेकांची क्षमा मागणे म्हणजे कटुतेचा नाश करून नात्यांना नव्या सौहार्दाने जोडणे होय. क्षमा हीच खरी आत्मशुद्धीची गुरुकिल्ली आहे. मानवाच्या जीवनात चुका अपरिहार्य आहेत. परंतु चुकांची जाणीव ठेवून त्या स्वीकारणे, त्याबद्दल मन:पूर्वक पश्चात्ताप करणे आणि ज्यांच्याशी अन्याय झाला त्यांची क्षमा मागणे हीच खरी आत्मशुद्धीची दिशा आहे. याच तत्त्वाचा अधिष्ठान म्हणजे पर्युषण पर्व. जैन धर्मातील हे श्रेष्ठ पर्व आत्मपरीक्षण, संयम आणि साधनेचा अनोखा सोहळा आहे. आठ दिवस चालणारे हे पर्व 'पर्युषण' या संज्ञेप्रमाणे आत्म्यात 'उष्ण' होणे, म्हणजेच आत्मिक जागृती व अंतर्मुख होणे शिकवते. या काळात उपवास, नियमपालन, स्वाध्याय व ध्यानसाधना यांचा विशेष महत्त्वाने स्वीकार केला जातो. पर्युषणाच्या अखेरीस येणारा क्षमापना दिवस हा केवळ धार्मिक विधी नसून





मानवी नात्यांचे पुन:शुद्धीकरण करणारा दिवस आहे. "मिच्छामी दुक्कडम्" म्हणजे मी जाणून-बुजून किंवा अजाणतेपणी जर तुम्हाला दुखावले असेल, तर मला क्षमा करा हा संदेश समाजातील प्रत्येकाला शांततेची, समरसतेची आणि आपुलकीची शिकवण देतो. आजच्या धावपळीच्या जीवनात कटुता, गैरसमज, राग-लोभ यामुळे नाती दुरावतात. पर्युषण पर्व आपल्याला हेच आठवण करून देते की, क्षमा ही दुर्बलतेचे नव्हे तर सामर्थ्याचे लक्षण आहे. क्षमेने मन हलके होते, वैरभाव नाहीसा होतो आणि समाजात सौहार्द टिकतो. आज आपण सर्वांनी या पर्वाचा खरा आत्मा जपून, "मिच्छामी दुक्कडम्" या भावनेने एकमेकांची क्षमा मागितली, तर नक्कीच आपल्या जीवनात आणि समाजात नवा प्रकाश पसरू शकेल.

**- नितीन ओस्तवाल**

# मुक्त विद्यापीठ आणि बीव्हीजी इंडिया लि. यांच्यात सामंजस्य करार

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि बीव्हीजी इंडिया लिमिटेड यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला आहे. करारानुसार दोन्ही संस्था संयुक्तरित्या नवी मुंबई येथील जेएनपीए परिसरात ड्रायव्हिंग आणि लॉजिस्टिकचे देशातील सर्वात अत्याधुनिक प्रशिक्षण आणि कौशल्य विकास केंद्र स्थापन करणार आहेत.

विद्यापीठात उभय पक्षातर्फे करारावर स्वाक्षरी केली. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, बीव्हीजी इंडिया लिमिटेडच्या लर्निंग अँड डेव्हलपमेंटचे सहायक उपाध्यक्ष सुरज महाजन, विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड,व्यवसाय शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम,बीव्हीजीचे उत्तर महाराष्ट्र विभागप्रमुख बाळासाहेब कांकळे,वरिष्ठ व्यवस्थापक प्रशिक्षण सुदर्शन भालेराव उपस्थित होते. या करारानुसार अत्याधुनिक प्रशिक्षण आणि कौशल्य विकासकेंद्र निर्मितीचा उपक्रम ड्रायव्हिंग व लॉजिस्टिक क्षेत्रात जागतिक दर्जाची कौशल्ये, आंतरराष्ट्रीय प्रमाणीकरण आणि मोफत प्रशिक्षणाची त्रिसूत्री पूर्ण करेल. जेएनपीए मधील बिझनेस फॅसिलिटेशन सेंटरमध्ये या प्रकल्पाचा पहिला प्रशिक्षण वर्ग राबवला जाईल.त्यानंतर जेएनपीएच्या नवीन परिसरात पूर्णवेळ प्रशिक्षण सुविधा विकसित केल्या जातील. त्यात जागतिक स्तराच्या सुविधा उपलब्ध असतील.प्रामुख्याने थिअरी साठी अद्ययावत वर्ग खोल्या, सिम्युलेटर लॅब, ऑटो इंजिनिअरिंगसाठी प्रयोगशाळा, ड्रायव्हिंग रेंज, कंट्रोल रूम आणि मेस व निवासाची व्यवस्था असेल. प्रशिक्षणार्थींना आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त प्रक्रियांचे ज्ञान दिले जाईल. आरटीओ आणि इतर संस्थांशी समन्वय साधून परवाना नूतनीकरण आणि प्रगत प्रमाणपत्राची सुविधा मिळेल. जड व हलक्या वाहन चालकांसाठी प्रशिक्षणार्थींना आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त प्रक्रियांचे ज्ञान मिळणार. आरटीओ आणि इतर संस्थांशी समन्वय साधून परवाना नूतनीकरणआणि प्रगत सर्टिफिकेशनची सुविधा मिळेल.जड व हलक्या वाहन चालकांसाठी आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र प्रशिक्षण चालक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवाढीचा अभ्यासक्रम. रस्ता सुरक्षा आणि व्यवस्थापन प्रशिक्षण, पोर्ट लॉजिस्टिक, वेअरहाउसिंगची माहिती. मल्टी-मॉडल ट्रान्सपोर्टचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. आंतरराष्ट्रीय नोकरीसाठी सक्षम व्यवस्था तयार करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करण्याचे कराराचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत.





> हा प्रकल्प भारतातील ड्रायव्हिंग आणि लॉजिस्टिक ६६ प्रशिक्षण क्षेत्रात क्रांती घडवणारा ठरेल.शिक्षण-प्रशिक्षण आणि रोजगार याचे जिवंत उदाहरण या कराराद्वारे आपणास बघावयास मिळेल.
>
> **- डॉ.संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

> बीव्हीजीच्या लर्निंग ॲण्ड डेव्हलपमेंट चमूसाठी अभिमानाचा क्षण आहे. आम्ही प्रशिक्षणासोबत भविष्यातील जागतिक ड्रायव्हिंग नेतृत्व घडवत आहोत.
>
> **- सुरज महाजन, सहायक उपाध्यक्ष, बीव्हीजी इंडिया लिमिटेड**

# सिव्हिल सर्जन डॉ. चारुदत्त शिंदे यांच्या तत्काळ बदलीची मागणी

## वंचित बहुजन युवक आघाडीचा आक्रोश मोर्चा

**नाशिक ।** जिल्हा रुग्णालय नाशिकमध्ये सुरू असलेल्या गैरकारभार, बोगस टेंडर आणि रुग्णांना होणाऱ्या अमानुष त्रासाच्या गंभीर आरोपांवरून जिल्हा शल्य चिकित्सक चारुदत्त शिंदे यांच्या तात्काळ बदलीची मागणी जोर धरत आहे. वंचित बहुजन युवक आघाडीने काल सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक आक्रोश मोर्चा काढून शिंदेंच्या भ्रष्टाचाराबाबत चौकशी करून त्यांची तात्काळ बदली करण्याची मागणी केली आहे. वंचित बहुजन युवक आघाडीचे महानगर प्रमुख रवींद्र पगारे यांनी जिल्हाधिकारी नाशिक यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, यापूर्वी अनेकवेळा जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार, बोगस अहवाल आणि गैरकारभाराबाबत पुराव्यानिशी तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, वरिष्ठ पातळीवरून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. सर्वात गंभीर बाब म्हणजे मागासवर्गीय समाजातील तरुणी शितल मोरे हिचा मृत्यू. या घटनेला तब्बल आठ महिने उलटूनही दोषींवर ना कारवाई झाली ना गुन्हा दाखल करण्यात आला. उलटपक्षी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शिंदे यांनी स्वतःच्या डॉक्टरांच्या समितीकडून बोगस अहवाल सादर करून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर न्याय मागण्यासाठी गेलेल्या तक्रारदारांवरच खोटे गुन्हे दाखल करण्याची कारवाई केल्याचा आरोप पगारे यांनी केला.



**गंभीर आरोप:**
- बोगस टेंडर प्रक्रियेतून मोठ्या गैरव्यवहाराचा आरोप
- रुग्णांना उपचारामध्ये झालेली थेट फसवणूक
- मृत्यूच्या प्रकरणात चौकशी समितीचा अहवाल दडपशाहीने वळवला
- तक्रारदारांवर उलट गुन्हे दाखल करून दबाव टाकण्याचा प्रयत्न

रवींद्र पगारे यांनी निवेदनात म्हटले आहे की, "जिल्हा रुग्णालय नाशिकमध्ये सुरू असलेल्या बोगस कारभारामुळे रुग्णांना जीवावर बेतणारी गैरसोय सहन करावी लागत आहे. यामागे डॉ. शिंदे यांचा थेट सहभाग असून अशा अधिकाऱ्याची तात्काळ बदली केली पाहिजे. अन्यथा तीव्र जनआंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. याप्रकरणी वंचित बहुजन युवक आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर नाशिकच्या आरोग्य व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला समाजातील विविध संघटनांचा पाठिंबा दिला असून, जिल्हा प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.

# गणेशोत्सवानिमित्त विंचूर शहरात पोलिसांचा रूट मार्च; कायदा सुव्यवस्थेसाठी पोलिस सज्ज



**मच्छिंद्र साळुंके**

**विंचूर ।** शहरात गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कुठलाही अनुचित प्रकार घडू नये आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी विंचूर पोलिसांनी मंगळवारी दणदणीत रूट मार्च काढत गुंड-गुन्हेगारांना थेट इशारा दिला. विंचूर पोलिस स्टेशनपासून सुरुवात झालेला रूट मार्च शहराच्या मुख्य मार्गांवरून मोठ्या दिमाखात काढण्यात आला.

कॉलेज रोड, मारवाडी पेठ, नेहरू चौक, बजरंग मंडळ, सिद्धार्थ नगर, बाजार गल्ली असा प्रमुख भाग व्यापत पुन्हा विंचूर पोलिस स्टेशन येथे समारोप करण्यात आला. रॅपिड ॲक्शन फोर्स, दंगा नियंत्रण पथक आणि स्थानिक पोलिस दलाच्या उपस्थितीमुळे संपूर्ण शहरात शिस्तबद्ध आणि कडक वातावरण निर्माण झाले.पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक किरण साळुंके, उपनिरीक्षक मोहन पाटील, हवालदार सागर आरोटे, अविनाश सांगळे यांच्यासह मोठ्या संख्येने पोलिस कर्मचारी सज्ज होते.गणेशोत्सव काळात गुन्हेगारी प्रवृत्ती डोके वर काढू नये यासाठी विंचूर पोलिसांचा हा कडक रूट मार्च महत्त्वाचा ठरला असून, शहरात पोलिसांची मजबूत उपस्थिती नागरिकांच्या सुरक्षेसाठी विश्वासार्ह ठरत आहे.

## महत्त्वाचे

### ठाकरे गटातर्फे प्रभाग एकमध्ये डासमुक्त प्रभाग मोहिमेस प्रारंभ

**नाशिक ।** डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यासारख्या आजारांपासून नागरिकांचे संरक्षण



करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि सुरंजन बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने डासमुक्त प्रभाग या मोहिमेची सुरुवात प्रभाग क्रमांक १ मध्ये करण्यात आली. पूर्व विधानसभा संघटक विशाल कदम यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या मोहिमेचाचा शुभारंभ करण्यात आला.परिसर स्वच्छ ठेवणे,डासांची पैदास थांबवणे,नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन माझा प्रभाग, माझी जबाबदारी या घोषवाक्याखाली रस्ते, गल्ल्या, पाणी साठे आणि डासांची पैदास होऊ शकणारी सर्व ठिकाणे यांत्रिक धूर फवारणीद्वारे स्वच्छ केली जाणार आहेत. या मोहीमेचा शुभारंभ जिल्हाप्रमुख डी. जी. सुर्यवंशी, महानगर प्रमुख प्रथमेश गिते यांच्या हस्ते झाला. यावेळी उपजिल्हाप्रमुख महेश बर्वे, महानगर संघटक सुनिल जाधव,महिला जिल्हा संघटक स्वाती पाटील,दिलीप मोरे, नितीन जाधव, युवतीसेना जिल्हाचिटणीस मधू पाटील, रोहन तांबे, ज्योती कुमावत, नितीन जाधव, सुधीर कुमावत,अक्षय फडोळ आदी उपस्थित होते. गेल्या काही आठवड्यांपासून प्रभाग क्रमांक १ मध्ये डासांच्या प्रचंड वाढीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. अनेकांनी महापालिकेकडे वारंवार तक्रारी केल्या, परंतु समाधानकारक उपाय न झाल्याने कदम यांनी ही मोहीम सुरू केली.आठवडाभर प्रभागातील सर्व भागांत टप्प्याटप्प्याने धूर फवारणी केली जात आहे. आजारांपासून बचाव करण्यासाठी पत्रके वाटप करून जनजागृती केली जात आहे.

### आडगाव परिसरात बिबट्याचे दर्शन


**आडगाव ।** आडगाव परिसरातील मळे वस्ती परिसरात बिबट्याचे दर्शन घडल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रविवारी (दि. २४) मध्यरात्री आडगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय पिसे यांच्या मार्गदर्शन खाली नेहमी प्रमाणे दररोज स्थानिक गुन्हे शोध पाथकाचे कर्मचारी रात्री पेट्रोलिंग करत असताना त्यांना मते मळे वस्ती आणि. हॉटेल जुगनू परिसरात बिबटयाचे फिरत असताना दिसून आला. जुगनू हॉटेल परिसरात बिबटयाने कुत्र्याला उचलून नेले. असून. याची माहिती आडगाव पोलीस स्टेशनचे. स्थानिक गुन्हे शोध पथकाचे. दादासाहेब वाघ व त्यांचे इतर सहकारी यांनी दिली असून. बिबट्याचे दहशतीमुळे आडगाव, मळेवस्ती परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले याची दखल वनविभागाने घेणे अत्यंत गरजेचं आहे. म्हणजे पुढील अनर्थ घटना होण्यापासून मदत होईल.

# वणीच्या शांततेला अवैध धंद्यांचे ग्रहण; मटका, दारू, गुटखा, अंमली पदार्थांचा धुमाकूळ

## गुन्हेगारीला राजकीय कवच । वणीकरांची सुरक्षा धोक्यात?

**नाशिक ।** दिंडोरी तालुक्यातील वणी शहरात गेल्या काही दिवसांत अवैध व्यवसायांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. मटका-जुगाराचे अड्डे, गुटखा विक्री, अवैध दारू तसेच आमली पदार्थासारख्या वस्तूंचा खुलेआम पुरवठा होत असून,त्यामुळे शहराची शांतता धोक्यात आली आहे.बहुतेक अवैध व्यवसाय चालकांना राजकीय वरदहस्त लाभल्याने कारवाई करण्यासाठी पोलिसांनाही अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी याकडे लक्ष देतील





- अनेक ठिकाणी मटक्याबरोबरच दारू विक्रीही सुरू
- प्रशासनाचे दुर्लक्ष? पोलिस व स्थानिक यंत्रणांनी लक्ष घालण्याची गरज!

का असाही सवाल उपस्थित केला जात आहे.

एकेकाळी तत्कालीन पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांच्या कार्यकाळात या अवैध व्यवसायांवर कडक कारवाई होत असल्याने व्यावसायिक दहशतीत होते. त्यावेळी मटका-जुगाराचे अड्डे पूर्णपणे बंद पडले होते. मात्र गेल्या वर्षांत पुन्हा नव्या जोमाने हे धंदे सुरू झाले आहेत.

अशा अवैध धंद्यांना राजकीय कवच मिळत असल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढले असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. या बेकायदेशीर कमाईतून दादागिरी, हाणामाऱ्या, वर्चस्ववाद आणि दमबाजी वाढत असून नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. भूतकाळातील एका मटका व्यावसायिकावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याची आणि त्यानंतर वणी शहर बंद झाल्याची घटना आजही नागरिक विसरलेले नाहीत. त्या घटनेनंतर दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. सध्या सुरू असलेल्या अवैध धंद्यांमुळे पुन्हा तशाच गंभीर घटनेची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाल्याची, धास्ती शहरात निर्माण झाली आहे. दरम्यान, अवैध व्यवसायिकांनी कोशिंबा येथे कारवाईस गेलेल्या पोलिस पथकावर हल्ला केल्याची, तसेच वणी पोलीस ठाण्यातच अवैध दारू विक्रेत्याने कायदा हातात घेतल्याची धक्कादायक प्रकरणे यापूर्वीच उघडकीस आली आहे. एका यात्रेत काही समाजकंटकांनी तमाशा घातल्याचेही प्रकरण समोर आले होते. या सगळ्या घटना ही फक्त बाहेर आलेल्या असतानाही यावंत यावर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांना अपयश येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अजून अनेक धक्कादायक बाबी पडद्यामागून सुरू असल्याची जोरदार चर्चा आहे. अवैध व्यवसायाच्या पैशावर वाढणारे गुंड आणि त्यांना पाठीशी घालणारे राजकारणी यामुळे कायद्याचा धाकच उरलेला नाही.त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला आणि शांततेला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे अवैध धंद्यांवर नियंत्रण आणण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल आता वणीकर करत आहेत.वणी शहरात कायद्याची कठोर अंमलबजावणी आणि अवैध धंद्यांवर धडक कारवाई होणे गरजेचे आहे, अन्यथा वणीच्या शांततेला ग्रहण लागण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# मिरगाव फाट्याजवळ लॅब कर्मचाऱ्यास मारहाण करून पंधरा हजार लुटले

**सिन्नर ।** शिर्डी महामार्गावर रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत रस्त्याने मोटारसायकलने जाणाऱ्या प्रवाशांना मारहाण करून लुटले जाण्याची घटना काही दिवसांपूर्वी घडत असतानाच वावी येथील लॅब टेक्निशियन कर्मचाऱ्यास दिनांक 24 रोजी रात्री आठ वाजता घरी जात असताना मारहाण करून लुटल्याची घटना नुकतीच घडली आहे.

सुधाकर सोपान वक्ते- ३५ व त्याचा सहकारी सौरभ पवार वय २५ हे दोघेही जेहुर कुंभारी(कोपरगाव) येथून वावी येथे वृंदावन लॅब टेकनिशियनमध्ये खाजगी नोकरी करतात सायंकाळी काम आटोपल्यानंतर रात्री आठ वाजेच्या दरम्यान आपल्या पल्सर गाडीने घरी जात असताना मिरगाव फाट्या जवळ अज्ञात दोन मोटार सायकल वेगाने त्यांच्याजवळ येऊन आडवी लावली व काही न बोलता लोखंडी रॉड च्या साह्याने सुधाकरला मारहाण चालू केली व शिवीगाळ करताना तुला लय माज आला आहे तू काल गावात सुद्धा भांडणे केली आहे असे ते म्हणत होते त्यावेळी त्याच्या खिशामध्ये असलेले 15000 रोख काढून घेतले आणि सोबत असलेल्या पवार याच्याकडून पल्सर गाडीची चावी घेऊन ते शिर्डीच्या दिशेने पळून गेले जखमी झालेल्या सुधाकर वक्ते यांना त्याच्या मित्राने वावी येथे फोन करून माहिती दिली यावेळी काही मित्रांसह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन माहिती घेतली संशयतांनी केलेल्या शिवीगाडीवरून त्यांची जुन्या वादाचा काही संबंध आहे की संशीद हे रस्ता लुटी मध्ये सामील आहे याचा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विजय कोठावळे पुढील तपास करीत आहे. सिन्नर शिर्डी महामार्गावर महिन्याला एक दोन घटना या घडतच असतात मात्र नॅशनल हायवे सुरक्षा दल टोल नाका हे कुठले प्रकारे प्रवाशाची दखल घेत नसून चालकांना रात्रीच्या वेळी जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो.

# विंचूर येथे कै. विमल दुसाने यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त श्रीराम कथेचे आयोजन

**विंचूर ।** येथील दुसाने परिवारातर्फे कै. विमल दुसाने यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त श्रीरामकथेचे आयोजन करण्यात आले आहे. हभप.विवेक घळसासी यांच्या रसाळ वाणीतील रामकथा हा कार्यक्रम होणार असून, यात भाविकांना अध्यात्मिक ज्ञान व संस्कारांचा लाभ मिळणार आहे. हे रामकथा सोहळा मंगळवार दि. २६ ऑगस्ट ते रविवार दि. ३१ ऑगस्ट दरम्यान रोज रात्री ८ ते १० वाजता आयोजित केले आहेत. तसेच सोमवार दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९:३० ते १२:३० वाजता विशेष कार्यक्रम होईल. या दिवशी दुपारी १२:३० ते ३:०० वाजता महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे ठिकाण निसर्ग मंगल कार्यालय, निफाड रोड, विंचूर, ता. निफाड, जि. नाशिक येथे असून, दुसाने परिवाराने सहकुटुंब-सहपरिवार उपस्थित राहून श्रीरामकथेचे श्रवण करून अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# नासाका विद्यालयात गणपती कार्यशाळा



**नाशिकरोड ।** पळसे येथील नाशिक सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात शाडू मातीपासून गणपती तयार करण्याची कार्यशाळा संपन्न झाली.

नासाकाचे अवसायक प्रदीप आव्हाड आणि नाशिक सर्व सेवाभावी ट्रस्टचे मानद व्यवस्थापक सुधाकर गोडसे यांच्या प्रेरणेने हा उपक्रम घेण्यात आला. मुख्याध्यापक अरुण पगार आणि कैलास लहांगे तसेच शिक्षक-कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षकांनी पर्यावरण संरक्षणासाठी शाडू मातीपासून गणपती तयार करण्याचे महत्त्वसांगितले.

# पुंजाबाई गारे यांचे निधन



**सिन्नर ।** दातली (ता. सिन्नर) येथील पुंजाबाई हरी गारे (वय १०५) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात सहा मुले, तीन मुली, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषदेच्या माजी सभापती डॉ. प्रतिभा गारे यांच्या त्या सासूबाई व डॉ. भरत गारे यांच्या मातोश्री होत.

# सीईओंची आरोग्य केंद्रांना अचानक भेट

## चार कर्मचारी अनधिकृत गैरहजर कारणे दाखवा नोटीस

**नाशिक ।** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी रविवार रोजी कळवण तालुक्यातील नवी बेज व ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना अचानक भेट दिली. या भेटी दरम्यान नवी बेज येथील २ व ओतूर २ असे एकूण चार कर्मचारी अनधिकृतपणे गैरहजर असल्याचे आढळून आले.

या गैरहजर कर्मचाऱ्यांना तात्काळ कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या. नवी बेज प्राथमिक आरोग्य केंद्र येथे प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी व आरोग्य सहाय्यक हे कर्मचारी कार्यस्थळी अनुपस्थित होते, तर ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी तसेच परिचर कार्यस्थळी अनुपस्थित असल्याचे आढळले. या घटनेची गंभीर नोंद घेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तात्काळ जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना संबंधित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचा सूचना दिल्या, सदर कारणे दाखवा नोटीसबाबत जर समाधानकारक व समर्पक खुलासा प्राप्त झाला नाही, तर कठोर शिस्तभंगात्मक कारवाई करण्याबाबत त्यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी कळवण तालुक्यातील नवी बेज व ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देत पाहाणी केली.

## आजचा वाढदिवस



**श्री. शैलेश कुटे**
संचालक,
एसएसके ग्रुप ऑफ हॉटेल्स

# जी. डी. सावंत, सिध्दीविनायक महाविद्यालयात हरितालिका महोत्सव

नाशिक । गोदावरी शिक्षण मंडळ येथील जी.डी. सावंत वरिष्ठ व श्री सिद्धिविनायक कनिष्ठ महाविद्यालय एशियन फार्मसी इन्स्टिट्यूट महाविद्यालयातील प्राध्यापिका व महिला शिक्षकेतर कर्मचारी यांनी हरितालिका महोत्सवाचे आयोजन केले होते. गोदावरी शिक्षण मंडळाचे सचिव अशोक सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.




देवी पार्वतीच्या तपश्चर्या व अखंड समर्पणाचे प्रतीक असलेल्या हरितालिका व्रतानिमित्त गोदावरी शिक्षण मंडळातील सर्व महिला कर्मचाऱ्यांनी हरितालिका साजरी केली. देवी पार्वती व भगवान शंकर यांच्या कृपेने सर्वांच्या आयुष्यात सुख, शांती व समृद्धी नांदो हीच प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे संचालक डॉ. डब्ल्यू. एन. भेंडे, श्री सिद्धिविनायक कनिष्ठ महाविद्यालयाच्या विभाग प्रमुख एस. आर. शिंदे, संस्थेचे उपप्राचार्य डॉ. यू. बी. पवार, प्रा. नंदा सरगर, प्रा. तुषार पवार, प्रा. विपुल सोनगिरे, प्रा.अमृता पंडित, प्रा. एच. पी. देवरे, प्रा.मोनाली नागरे, प्रा.रोशनी कौर, प्रा.नीलम गांगुर्डे, प्रा.एच.डी जोंधळे, प्रा.कल्पना भोसले, प्रा.देवयानी बोरसे, प्रा.चैताली नवले, प्रा.किशोरी रौंदळ, प्रा. सुलोचना देशमुख, प्रा.मोनिका शेळके, प्रा. कांचन सूर्यवंशी प्रा.साक्षी जगताप, एशियन फार्मसी इन्स्टिट्यूटचे प्रा.भाग्यश्री कारले, प्रा.वैष्णवी वाघ, प्रा.पूनम मालोदे, प्रा. शिवानी पाटील, प्रा.ऋतुजा चव्हाण, प्रा. निशा वैधवे, प्रा.अमोल आंबेकर, प्रा.स्नेहा धामणे, प्रा.गौरी कापरे, प्रा.अंकिता चौधरी, प्रा.सिमरन रवाले, प्रा.प्रणाली पाटील, प्रा. शरयू गायकवाड, प्रा. गौरीजा वाणी, प्रा. दर्शना बोरसे, प्रा. योगिता सांगळे, प्रा. माधुरी ठाकरे, प्रा. अस्मिता राऊत, प्रा. गायत्री नवाटे, प्रा. नेहा सानप, स्नेहा अहिरे, पूजा खैरनार, कविता गोडसे, मंगला धोंगडे, सुनिता शिरसाट सारिका शिरसाट, वैशाली घुले. ज्योती मागे माधवी थापेकर आदींसह मोठ्या संख्येने संस्थेतील महिला शिक्षिका व महिला शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# उत्सव म्हणजे नाच, गाणी, डीजे नव्हे

गणेशोत्सव हे महाराष्ट्राचे वैभव आहे. गणपती ही बुध्दीची देवता आहे. महाराष्ट्रात घरोघरी गणेशाची स्थापन करून पूजन केले जाते. दिड दिवसांपासून दहा दिवसांपर्यंत घरोघरी गणेश मूतीर्ची पूजा केली जाते. गणेशोत्सवाच्या काळात कुटुंबातील सारे जण एकत्र असतात, रोज सकाळी व सायंकाळच्या आरतीला आवर्जून उपस्थित राहतात. घरोघरी गणपतीपुढे आरास, सजावट केली जाते. रोज फुले व प्रसाद ठेवला जातो. गणेशोत्सवात साऱ्या महाराष्ट्रात भक्तिमय वातावरण असते. मग रस्त्यावर साजरा होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवात आणि मिरवणुकांमधे धांगडधिंगा का घातला जातो? कानठळ्या बसविणाऱ्या आवाजात गाणी का लावली जातात? गणपतीपुढे हिडिस फिडिस नृत्य का केले जाते? भक्तिगीतांपेक्षा हिंदी चित्रपटातील नाच गाण्यांना वर्षाव का केला जातो ? भलेमोठे मंडप घालून रस्ते का अडवले जातात? आणि गणेशोत्सवाच्या दहा दिवसात वारेमाप खर्चाची उधळपट्टी का केली जाते ?



स्टेटलाईन

डॉ. सुकृत खांडेकर

sukritforyou@gmail.com

श्रावण महिना सुरू झाला की सण आणि उत्सवांची मालिका सुरू होते. दहिहंडीच्या दिवशी दुपारी बारा नंतर मुंबईचे अनेक रस्ते बंद होतात. गोविंदांची शेकडो पथके बसेस व ट्रक- टेम्पोमधून दहिहंडी फोडण्यासाठी मुंबई- ठाण्यात फिरत असतात. पन्नास हजारापासून पंचवीस लाखापर्यंत हंडी फोडणाऱ्या पथकांवर बक्षिसांचा वर्षाव केला जातो.

अशी मोठ मोठी बक्षिसे लावणाऱ्यांमधे राजकीय पक्षाचे नेते आणि लोकप्रतिनिधी असतात. राज्याचे अनेक आजी- माजी मंत्रीही त्यात आघाडीवर दिसतात. पुढाऱ्यांच्या छब्या असलेले टी शर्टस घालून गोविंदांची पथके मोठ्या उत्साहात फिरत असतात. आता तर नऊ आणि दहा थरांचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होताना दिसतात.

अनेक दहिहंडी कार्यक्रमांचे वृत्तवाहिन्यांवर दिवसभर थेट प्रक्षेपण केले जाते. अनेक ठिकाणी चंदेरी दुनियेतील अभिनेते व अभिनेत्री तिथे हजेरी लावतात. मंचावर सादर होणाऱ्या नाच गाण्यांच्या कार्यक्रमात अनेक नामवंत कलाकार हजेरी लावतात. हे कलावंत तिथे येण्यासाठी किती बिदागी घेतात याच्या आकेडवारीची नेहमीच उघड चर्चा ऐकायला मिळते.

दोन पाच लाखापासून ते पंधरा वीस लाखापर्यंत हेआकडे ऐकायला मिळतात. यावर्षी दहिहंडी उत्सवात चारशे गोविंदा तरी जखमी झाले आणि चार जणांचा मृत्यु झाला. दरवर्षी तीनशे गोविंद तरी जखमी होत असतात. काहींचे मृत्यु होतात. या गोविंदाच्या घरची परिस्थिती काय असते? जखमी गोविंदांचे पुढे काय होते? त्यांना विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई मिळते काय? त्याचे पुढे भविष्य काय? यावर कधी चर्चा होत नाही. दहिहंडी झाली की गणेशोत्सव. पुन्हा नाच, गाणी, डीजेच्या मोठ्या आवाजात सारे दंग झालेले दिसतात.

महापुरूषांच्या जयंती किंवा पुण्यतिथीला लहान मोठ्या शहरात गेल्या काही वषार्पासून मोठ्या मिरवणुका निघत आहेत. महापुरूषांचे फोटो लावलेले फ्लोट पुढे ठेवायचे व मागे डीजेच्या तालावर नाचायचे. हेच दृश्य सर्वत्र दिसते. एवढेच नव्हे तर हातात मद्याचे ग्लास आणि हातात सिगारेटी घेऊन बेभान झालेल्या तरूणांचे जथेही दिसू लागले आहेत. त्यांना आवरण्याचा कोणी प्रयत्न केला तर तुम्ही कोण सांगणार, आज आमचा दिवस आहे, आम्ही कसेही वागू .. अशी उत्तरे दिली जातात.

आपल्या नाचगाण्यामुळे व धिंगाण्यामुळे रस्त्यावरची वाहतूक दोनदोन चारचार तास ठप्प होते आहे याचे कुणालाच भान नसते. वाहतूक ठप्प झाल्याचे व्हिडिओ सोशल मिडियाव व्हायरल होतात पण कारवाई कुणावरच होत नाही. तक्रार आली तर कारवाई करू असा पोलिसांचा खाक्या असतो.

कोणी तक्रार केली तर त्याचेच नाव धिंगाणा घालणाऱ्या लोकांना समजते, यामागे कोण असते हे वेगळे सांगायला नको. रस्त्यावर वारंवार निघणाऱ्या मिरवणुकांना परवानगी का दिली जाते, कोण देतो, असे प्रश्न विचारचे नसतात. मिरवणुका नसतानाही मुंबई, पुणे अशा सर्वच शहरात रोज वाहतूक कोंडी असतेच मग आगमन असो वा विसर्जन, जयंती असो पुण्यतिथी या निमित्ताने निघणाऱ्या मिरवणुकांवर निदान वेळेचे तरी बंधन नको का ?

दहिहंडी, गणेशोत्सव, नवरात्रात गरबा, राजकीय पक्ष व त्याच्या बड्या नेत्यांच्या सभा अशा सर्वच ठिकाणी हजारो तरूण मुले उत्साहाने सहभागी झालेली दिसतात. सर्वच उत्सव, कार्य्क्रम, सभा, मिरवणुकांमधे सहभागी व्हायला, नाचायला, घोषणा द्यायला या तरूणांना वेळ कसा मिळतो? त्यांचे शिक्षण काय? ही तरूणाई काय काम करते? कमाई काय? उत्पन्न काय ? शिक्षण, रोजगार आणि सर्वात महत्वाचे संस्कार या तरूणांवर आहेत का?

गेल्या काही वर्षापासून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या आगमनाच्या मिरवणुका सुरू झाल्या आहे. त्यामुळे मुंबईतील रस्ते पुन्हा वाहतूक कोंडीत सापडू लागले आहेत. आगमन व विसर्जन मिरवणुका, भव्य आरास, भव्य सजावट, मोठे मांडव, रोज कार्यकर्त्यांची चहा पानाची व्यवस्था , विद्युत रोषणाई, कलावंताची बिदागी, पाहुण्यांची सरबराई, रोजचा प्रसाद, आरती किती प्रचंड खर्च होत असतो. त्यातून समाजाला विशेषतः तरूणाईला काय मिळते?

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला तो ब्रिटीशांच्या विरोधात जनजागृतीसाठी. लोकशिक्षण हा मुख्य हेतू होता. पण आज डीजे, नाच, गाणी, लाऊड स्पिकर्सवरील मोठाले आवाजाने गणेशोत्सव व्यापला आहे. गणेशोत्सवात सर्व रस्त्यावर राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांचे होर्डिंग आणि बॅनर्स सर्वत्र झळकत आहेत. गणेश भक्तांचे स्वागत अमराठी धनवंतांकडून व परप्रांतीय लोकांकडूनच मोठया प्रमाणावर फलकांवरून होत आहे.

गणशोत्सवाच्या काळात आरास , सजावट , फळे, फुले यांची विक्री प्रचंड होते, सर्वाधिक विक्रेते अमराठी आहेत असे लक्षात येते. वडापाव, बुर्जी पाव, आम्लेटपाव, चाईनिज, डोसा. पिज्झा, सँडविच आदी खाद्य पदार्थांच्या गाड्या रात्रभर पदपथावर व रस्त्यांवर गर्दीने वेढलेल्या असतात. हे विक्रेते सर्वाधिक अमराठी आहेत. उत्सवाच्या काळात हजारो मराठी तरूण मुलांचे जथे रस्त्यावर नाचत असतात आणि पाण्याच्या बाटल्या व वडा पाव विकून अमराठी पैसे कमावत असतात. अशा उत्सवातून आपण काही शिकणार आहोत की नाही?

डीजेचे फड इतके वाढले आहे की ध्वनिप्रदुषणाने सारी मुंबई व्यापली आहे. आजही शांतता प्रिय मुंबईकरांची संख्या लक्षावधी आहे. काहीही झाले तरी दुसऱ्या दिवशी सकाळी कामावर गेलेच पाहिजे, अशी संख्याही लक्षावधी आहे. घरात आजारी माणसे असतात. वयोवृध्द आई वडिल असतात. अभ्यास करून स्पर्धा परीक्षेला बसणारी हजारो मुले असतात. त्यांचा कोणी विचारच करणार नाही का?

डीजे, नाच, गाणी, धांगड धिंगा यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणीही राजकीय नेता किंवा पक्ष प्रयत्न करणार नाही. कारण नाचणारे, गाणी लावणारे हे बेभान लोक ही त्यांची व्होट बँक आहे. आता तर चार महिन्यांवर महापालिका, नगर परिषदांच्या निवडणुका आहे आहेत.

कानठळ्या बसविणारा डीजे नको असे सांगायला कोणी पुढे येणार नाही. राज्यकर्त्यांना ध्वनिप्रदुषण आणि वाहतूक कोंडी रोखण्यात किती रस आहे हे दरवेळी अनुभवायला मिळतेच. मग प्रामाणिक, शांतताप्रिय समाजाने व करदात्या मुंबईकरांनी उत्सवाच्या काळात अपेक्षा तरी कोणाकडे करायची?

# श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणाऱ्या व्रताविषयीचे शास्त्र



श्री गणेशचतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण आहे. श्री गणेश चतुर्थीला, तसेच श्री गणेशोत्सवाच्या दिवसांत गणेशतत्त्व नेहमीच्या तुलनेत पृथ्वीवर १ सहस्त्र पटीने कार्यरत असते.

या काळात केलेल्या श्री गणेशाच्या उपासनेने गणेशतत्त्वाचा अधिक लाभ होतो. सुखकर्ता, विघ्नहर्ता आणि अष्टदिशांचा अधिपती असलेल्या श्री गणेशाची पूजा भावपूर्ण होऊन त्याचा कृपाशीर्वाद मिळावा, असाच सर्व गणेशभक्तांचा प्रयत्न असतो.

श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणारे व्रत हे सिद्धीविनायक व्रत या नावाने ओळखले जाते. वास्तविक हे व्रत सर्व कुटुंबांत होणे क्रमप्राप्त आहे. सर्व भाऊ एकत्र रहात असतील म्हणजेच त्यांचा द्रव्यकोश (खजिना) आणि पाकनिष्पत्ती (चूल) एकत्र असेल, तर सर्वांत मिळून एक मूर्ती पुजली तरी चालते पण ज्या वेळी द्रव्यकोश आणि पाकनिष्पत्ती कोणत्याही कारणास्तव विभक्त असतील, तर त्यांनी आपापल्या घरी स्वतंत्र गणेशमूर्ती पुजावी. ज्या कुटुंबात एकच गणपति बसवण्याची दृढ परंपरा आहे, त्या कुटुंबात ज्या भावामध्ये देवाविषयी अधिक भाव आहे, त्याच्याच घरी गणपति बसवावा.

**नवीन मूर्तीचे प्रयोजन** : पूजेत गणपति असला, तरी गणपतीची नवीन मूर्ती आणावी. श्री गणेश चतुर्थीच्या वेळी गणेशलहरी पृथ्वीवर खूप जास्त प्रमाणात येतात. त्यांचे आवाहन नेहमीच्या पूजेतील मूर्तीत केल्यास तिच्यात खूप जास्त शक्ती येईल. जास्त शक्ती असलेल्या मूतीर्ची साग्रसंगीत पूजाअर्चा वर्षभर नीटपणे करणे कठीण जाते; कारण त्यासाठी कर्मकांडातील बंधने पाळावी लागतात. म्हणून गणेशलहरींचे आवाहन करण्यासाठी नवीन मूर्ती वापरतात आणि ती मूर्ती नंतर विसर्जित करतात.

**श्री गणेश चतुर्थीला पुजावयाची मूर्ती कशी असावी ?** :

चिकणमाती किंवा शाडूची माती यांपासून मूर्ती बनवावी, असा शास्त्रविधी आहे. अन्य वस्तूंपासून (उदा. प्लास्टर ऑफ पॅरिस, कागदाचा लगदा) मूर्ती बनवणे, हे धर्मशास्त्रविरोधी, तसेच पर्यावरणाला घातक आहे. मूर्तीची उंची एक फूट ते दीड फूट असावी. मूर्ती शास्त्रानुसार बनवलेली, पाटावर बसलेली, डाव्या सोंडेची अन् नैसर्गिक रंगांनी रंगवलेली असावी. परंपरा किंवा आवड यांप्रमाणे गणेशमूर्ती आणण्यापेक्षा धर्मशास्त्रसंमत गणेशमूर्ती पुजावी.

**शास्त्रोक्त विधी आणि रूढी यांचा अवधी** : भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मातीचा गणपति करतात. तो डाव्या हातावर ठेवून तेथेच त्याची सिद्धीविनायक या नावाने प्राणप्रतिष्ठा आणि पूजा करून लगेच विसर्जन करावे, असा शास्त्रविधी आहे; पण मनुष्य हा उत्सवप्रिय असल्याने एवढ्याने त्याचे समाधान होईना; म्हणून दीड, पाच, सात किंवा दहा दिवस श्री गणपति ठेवून त्याचा उत्सव करू लागला.

बरेच जण (ज्येष्ठा) गौरीबरोबर गणपतीचे विसर्जन करतात. एखाद्याच्या कुलाचारात गणपति पाच दिवस असेल आणि तो त्याला दीड किंवा सात दिवसांचा करावयाचा असला, तर तो तसे करू शकतो. यासाठी अधिकारी व्यक्तीस विचारण्याची जरूरी नाही. रूढीप्रमाणे पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, सहाव्या, सातव्या किंवा दहाव्या दिवशी श्री गणेशविसर्जन करावे.

**मूर्तीची आसनावर स्थापना** : पूजेपूर्वी ज्या पाटावर मूर्तीची स्थापना करायची असते, त्यावर तांदूळ (धान्य) ठेवून त्यावर मूर्ती ठेवतात. आपापल्या प्रथेप्रमाणे थोडे तांदूळ किंवा तांदुळाचा लहानसा ढीग करतात. मूर्तीत गणपतीचे आवाहन करून तिची पूजा केल्याने मूर्तीत शक्ती निर्माण होते. त्या शक्तीमुळे तांदूळ भारित होतात. सारख्या कंपनसंख्येच्या दोन तंबोऱ्याच्या दोन तारा असल्या, तर एकीतून नाद काढल्यास तसा नाद दुसऱ्या तारेतूनही येतो. त्याचप्रमाणे मूतीर्खालील तांदुळात शक्तीमुळे स्पंदने निर्माण झाली की, घरातील तांदुळाच्या साठ्यातही शक्तीची स्पंदने निर्माण होतात. अशा तऱ्हेने शक्तीने भारित झालेले तांदूळ वर्षभर प्रसाद म्हणून खाता येतात.

**पुजावयाची मूर्ती घरी कशी आणावी ?**

श्री गणेश चतुर्थीसाठी पुजावयाची मूर्ती शक्यतो आदल्या दिवशीच आणून ठेवावी. श्री गणेशाची मूर्ती घरी आणण्यासाठी घरातील कर्त्या पुरुषाने इतरांसह जावे. मूर्ती हातात घेणाऱ्याने हिंदू वेशभूषा करावी, म्हणजे अंगरखा (सदरा)-धोतर किंवा अंगरखा-पायजमा परिधान करावा. त्याने डोक्यावर टोपीही घालावी.

मूर्ती आणतांना तिच्यावर रेशमी, सुती किंवा खादीचे स्वच्छ वस्त्र घालावे. मूर्ती घरी आणतांना मूतीर्चे मुख आणणाऱ्याकडे आणि पाठ समोरच्या दिशेस असावी. मूर्तीच्या समोरच्या भागातून सगुण तत्त्व, तर पाठच्या भागातून निर्गुण तत्त्व प्रक्षेपित होत असते.

मूर्ती हातात धरणारा हा पूजक असतो. मूर्तीचे मुख त्याच्याकडे केल्यामुळे त्याला सगुण तत्त्वाचा लाभ होतो, तर इतरांना निर्गुण तत्त्वाचा लाभ होतो. श्री गणेशाचा जयजयकार आणि भावपूर्ण नामजप करत मूर्ती घरी आणावी.

घराच्या उंबरठ्याबाहेर उभे रहावे. घरातील सुवासिनीने मूर्ती आणणाऱ्याच्या पायांवर दूध आणि नंतर पाणी घालावे. घरात प्रवेश करण्यापूर्वी मूर्तीचे मुख समोरील दिशेस करावे. यानंतर मूतीर्चे औक्षण करून ती घरात आणावी.

सजवलेल्या मखरात पाटावर किंवा चौरंगावर थोड्या अक्षता घालून त्यावर मूर्ती ठेवावी. सजावट पूर्ण व्हायची असल्यास मूर्ती अन्य सुरक्षित जागी ठेवून सजावट लवकरात लवकर पूर्ण करावी. मूर्तीला मखरात बसवल्यानंतर मूर्ती हलणार नाही किंवा मूर्तीस काही अपाय होणार नाही, याची काळजी घ्यावी. मूर्तीवर एखादे वस्त्र किंवा रूमाल घालून ती झाकून ठेवावी. उंदराची मूर्ती वेगळी असल्यास तीही सुरक्षित ठेवावी.

मूर्तीचे मुख पश्चिम दिशेला असेल अशा पद्धतीने ठेवावी, तसे शक्य नसल्यास पूजकाने पूजा करतांना स्वतःचे तोंड दक्षिण किंवा पश्चिम दिशेला येणार नाही, अशा पद्धतीने बसावे. मूर्तीचे तोंड पूर्व किंवा उत्तर दिशेला असेल, तर पूजकाने मूर्तीच्या डाव्या हाताला काटकोनात बसावे, म्हणजे पूजकाचे मुख उत्तरेला किंवा पूर्वेला होईल.

दक्षिण दिशेला मूर्तीचे तोंड असू नये. दक्षिणेकडे तोंड साधारणपणे उग्र देवतांचे असते, उदा. काली, हनुमान, नरसिंह इत्यादी. गणपतीची जी मूर्ती आपण आणतो, ती उग्र नसून प्रसन्न किंवा शांत असते; म्हणूनच शक्यतो तिला दक्षिणमुखी ठेवू नये.

**मध्यपूजाविधी** : गणपति घरी असेपर्यंत प्रतिदिन सकाळी आणि संध्याकाळी प्राणप्रतिष्ठा सोडून गणपतीची नेहमी पूजा करतो तशी पूजा करावी आणि शेवटी आरत्या आणि मंत्रपुष्प म्हणावे. गणेशमूर्तीच्या प्रतिष्ठापनेनंतर प्रतिदिन करावयाची पंचोपचार पूजा करावी.

**उत्तरपूजा** : गणपतीच्या विसर्जनापूर्वी ही पूजा करायची असते. विशिष्ट मंत्र म्हणून पुढे दिल्याप्रमाणे पूजा करावी - १. आचमन, २. संकल्प, ३. चंदनार्पण, ४. अक्षतार्पण, ५. पुष्पार्पण, ६. हरिद्रा (हळद)-कुंकूमार्पण, ७. दूर्वार्पण, ८. धूप-दीप दर्शन आणि ९. नैवेद्य. यानंतर आरती करून मंत्रपुष्पांजली समपार्वी. सर्वांनी गणपतीच्या हातावर अक्षता द्याव्या आणि मूर्ती उजव्या हाताने हालवावी.

**विसर्जन** : उत्तरपूजेनंतर मूर्तीचे जलाशयात विसर्जन करतात. विसर्जनाला जातांना गणपतीबरोबर दही, पोहे, नारळ, मोदक वगैरे शिदोरी द्यावी. जलाशयाजवळ पुन्हा आरती करावी आणि मूर्ती शिदोरीसह पाण्यात सोडून द्यावी.

श्री गणेश चतुर्थी या दिवशी चंद्रदर्शन करणे वर्ज्य असणे -

श्री गणेश चतुर्थीला कलंकित चतुर्थी असेही म्हणतात. या चतुर्थीला चंद्र पहाणे वर्जित आहे. चुकूनही चतुर्थीचा चंद्र दिसल्यास श्रीमद्भागवताच्या १० व्या स्कंधाच्या ५६-५७ व्या अध्यायात दिलेली स्यमंतक मण्याची चोरी ही कथा आदराने वाचली किंवा ऐकली पाहिजे.

भाद्रपद शुक्ल तृतीयेचा किंवा पंचमीचा चंद्र पहावा. यामुळे चतुर्थीला चंद्रदर्शन झाल्यास त्याचा अधिक धोका रहात नाही. चुकून चंद्रदर्शन झाल्यास पुढील मंत्राने अभिमंत्रित केलेले पवित्र जल प्राशन करावे. या मंत्राचा २१, ५४ किंवा १०८ वेळा जप करावा.

सिंह : प्रसेनमवधीत सिंहो जाम्बवता हतः ।

सुकुमारक मा रोदीस्तव ह्येष स्यमन्तकः ।।

ब्रह्मवैवर्त पुराण, अध्याय 78

अर्थ : हे सुंदर सुकुमार! या मण्यासाठी सिंहाने प्रसेनला मारले आहे आणि जांबुवंताने त्या सिंहाचा संहार केला आहे; म्हणून तू रडू नकोस. आता या स्यमंतक मण्यावर तुझाच अधिकार आहे.

---

**संकलन : सौ. अंजली पाध्ये**

**सनातन संस्था, नागपूर**

**९९७५५३६९०६**

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'गणपति'**

# शालार्थ घोटाळा म्हणजे डिजिटल फसवणूक, देणगीचा मुद्दा नव्हे!

अलीकडच्या काही दिवसांत महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात शालार्थ घोटाळा हा चर्चेचा प्रमुख विषय ठरला आहे. परंतु दुर्दैवाने ही चर्चा चुकीच्या दिशेला वळली आहे. सरकारी सॉफ्टवेअर प्रणालीतून बनावट शालार्थ आयडी तयार करून वेतन व निधीचा अपहार करणे ही खरी समस्या असूनसुद्धा, लोक या घोटाळ्याला शाळा व्यवस्थापनाच्या डोनेशन प्रथेशी जोडून पाहत आहेत.

ही तुलना चुकीची आणि धोकादायक आहे. कारण यामुळे खरी जबाबदारी झाकली जाते, आणि लोकांचे लक्ष मूळ फसवणुकीवरून हटवले जाते.

**घोटाळा विरुद्ध डोनेशन प्रथा : खरी तुलना**

**शालार्थ घोटाळा:**

सरकारी सॉफ्टवेअर प्रणालीत खोटे आयडी तयार करणे, बनावट कर्मचारी दाखवणे आणि त्यांच्या नावावर वेतन व निधी अपहार करणे. हा स्पष्ट डिजिटल फसवणुकीचा प्रकार आहे.

**डोनेशन प्रथा:**

गेली ५० वर्षे शाळांमध्ये नोकरीसाठी देणगी किंवा जबरदस्तीने पैसे घेण्याचा प्रश्न अस्तित्वात आहे. ही सामाजिक व आर्थिक समस्या आहे.

**तुलना समजण्यासाठी साधे उदाहरण:**

एखादा पोलीस अधिकारी खोटी एफआयआर दाखल करण्यासाठी लाच घेताना पकडला, तर त्या गुन्ह्यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. पण लोकांनी हे म्हणायला सुरुवात केली की, त्याने तर पोस्टिंगसाठीही लाच दिली असेल! हा वेगळा मुद्दा आहे. एफआयआर मधील लाच प्रकरणावर पांघरूण घालता येणार नाही.

अशाच प्रकारे शालार्थ घोटाळा हा डिजिटल गैरव्यवहार आहे, तर डोनेशन प्रथा ही दीर्घकालीन सामाजिक समस्या आहे.



**अरूण सोपानराव कराळे**

**सेवानिवृत्त पदवीधर शिक्षक**

**दत्तवाडी, नागपूर.**

**९०९६३२६२७२**

**शाळा व्यवस्थापन व शिक्षकांची वस्तुस्थिती**

लोकमतामध्ये शालार्थ घोटाळ्याचा संबंध शाळा व्यवस्थापन भ्रष्ट असल्याच्या धोरणाशी जोडला जातो. मात्र वास्तव वेगळे आहेः

अनेक शिक्षक दशकांपासून अनुदानित नसलेल्या शाळांमध्ये काम करत आहेत, कायम नोकरीच्या आशेने.

गणित, विज्ञान आणि आरक्षित प्रवगार्तील उमेदवार अनुदानित शाळांत तातडीने आवश्यक आहेत.

व्यवस्थापनांवर राजकीय नेते व शिक्षणाधिकारी दबाव आणतात की त्यांचे उमेदवार घ्यावेत. बदल्यात ते रिक्त पदे मंजूर करण्याचे आश्वासन देतात.

यामुळे व्यवस्थापनांची प्रतिमा एकसारखी भ्रष्ट म्हणून रंगवणे चुकीचे आहे.

**अनुदानित शिक्षणाचे अर्थकारण**

डोनेशन प्रथा समजून घेण्यासाठी शाळा चालवण्याच्या अर्थकारणाकडे पाहावे लागेलः आज शाळा चालवणे हे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर नाही.

अनेक व्यवस्थापनांना त्यांच्या शाळांच्या इमारती गोदामे किंवा ऑफिसेसला भाड्याने देणे अधिक फायदेशीर ठरते.

तरीदेखील अनेक व्यवस्थापनं शाळा चालवण्याला सेवा-केंद्रित जबाबदारी म्हणून निभावत आहेत.

होय, नोकरीसाठी डोनेशन मागितले जाते, हे नाकारता येत नाही. पण ही प्रथा मर्यादित पदे आणि वाढती नोकरीची मागणी यामुळे जन्माला आली. सरकारने लोकसंख्येनुसार पुरेशी नोकरीची पदे निर्माण केली नाहीत, हेच खरे शासकीय अपयश आहे.

**खरा मुद्दा कुठे आहे?**

शालार्थ घोटाळ्याच्या चर्चेत डोनेशनचा मुद्दा ओढून आणण्याचा एकच उद्देश आहे, बनावट आयडी तयार करून पगार लुटणारे गुन्हेगार झाकले जावेत.

त्यामुळे निरपराध शिक्षक, पालक व व्यवस्थापनांना चुकीच्या पद्धतीने दोष दिला जातो.

जर चर्चा अशीच गोंधळलेली राहिली, तर शालार्थ घोटाळ्याचे खरे दोषी हातातून निसटतील.

**नागरिकांसाठी संदेश**

शालार्थ घोटाळा हा फक्त डोनेशनचा प्रश्न नाही, तर डिजिटल फसवणूक आणि सरकारी प्रणालीचा गैरवापर आहे.

खरे दोषी आहेत ते बनावट कर्मचारी तयार करून वेतन लुटणारे.

समाजाने लक्ष केंद्रीत ठेवले पाहिजे की ही फसवणूक उघडकीस आणली जावी.

अन्यथा खरे गुन्हेगार सुटतील आणि पुन्हा शिक्षक, व्यवस्थापन व पालक यांनाच दोषी ठरवले जाईल.

**: निष्कर्ष :**

शालार्थ घोटाळा हा शैक्षणिक क्षेत्रातील डिजिटल लूट आहे. तो डोनेशनसारखा सामाजिक प्रश्न नाही. खरी जबाबदारी लपवण्याचा खेळ थांबवून नागरिकांनी लक्ष खऱ्या गुन्हेगारांवर केंद्रित करणे हीच काळाची गरज आहे.

## वाचक लिहितात

### राज्यघटनेतील १३० सुधारणा

संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये १३० घटनादुरुस्ती हे अत्यंत महत्त्वाचे विधेयक मांडण्यात आले. पंतप्रधान, मुख्यमंत्री तसेच राज्य आणि केंद्रशासित प्रदेश यामधील मंत्री या राज्यघटनात्मक महत्त्वांच्या पदांवरील व्यक्ती गंभीर गुन्ह्यांमध्ये आढळल्यास त्यांना पदावरून थेट बाजूला हटवण्याचा कायदेशीर मार्ग या कायद्याद्वारे प्राप्त होणार आहे.

यामध्ये पाच वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधीच्या शिक्षेचे प्रावधान असलेल्या गंभीर गुन्हा नोंद झाल्यास अन ३० दिवसाच्या आत जामीन न मिळाल्यास एकतिसव्या दिवशी त्यांना पदावरून हटवता येऊ शकेल. भविष्यात त्यांचे निर्दोषत्व सिद्ध झाल्यास त्यांना पुन्हा पदभार स्वीकारता येऊ शकेल.

आरोप सिद्ध झालेले नसताना गंभीर गुन्हाच्या आरोपावरून नैतिकदृष्ट्या राज्यघटनात्मक पदावरील व्यक्तीला हटवण्याचे प्रावधान असलेला हा देशातील पहिलाच कायदा ठरेल. लोकपाल कायद्यानंतर मंत्री मुख्यमंत्री आणि प्रधानमंत्री यांना कायद्याच्या चौकटीत आणणारा हा आणखीन एक ऐतिहासिक कायदा ठेवू शकेल परंतु या विधेयकाला अनेक विरोधकांनी विरोध केला आहे.

भ्रष्टाचार करून आणि गुन्हेगारीला थारा देऊन कोट्यवधी जनतेचे नेतृत्व करण्याचा नैतिक अधिकार एखाद्याला राहतो का याचा विचार सर्वपक्षीयांनी विरोध करण्यापूर्वी करणे आवश्यक आहे.

एखादा कायदा संसदेत संमत करताना किंवा त्याला विरोध करताना सत्ताधारी आणि विरोधक यांचा विचार राष्ट्रहिताचाच असायला हवा. वादविवाद किंवा चर्चा यातून चांगल्या कायद्याची निर्मिती ही सकस लोकशाहीचे लक्षण आहे. आमदार आणि खासदारांना निवडून देताना लाखो नागरिक मतदान करतात. मंत्रिपदाची शपथ घेतल्यावर अथवा सरकार स्थापन झाल्यावर ते कोणत्या एका राजकीय पक्षापुरते मर्यादित न राहता समाज आणि राष्ट्रहितासाठी बांधील असावे हा खरा लोकशाहीचा गाभा आहे.

आपल्या भारतीय संस्कृती राजा कसा असावा त्याची काही उदाहरणे आहेत ती म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, प्रभू श्रीराम, शिबिराजा यांनी राजा म्हणून किती विचार करावा लागतो, किती कर्तव्य कठोर व्हावे लागते आणि प्रजे सर्व प्राणीमात्रांचे पालक व्हावे लागते हे दाखवतात. आज देशात लोकशाही आहे त्यामुळे लोकशाहीतील राज्यघटनात्मक महत्त्वाच्या पदांवरील व्यक्ती याचे प्रथम कर्तव्य राष्ट्रहित व धर्महित जपणे असे असायला पाहिजे मग ती व्यक्ती सत्ताधारी पक्षात असो वा विरोधी पक्षात सर्वांना हा नियम लागू आहे.

**■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.**

### ऋषीपंचमी व्रत : ऋषींच्या ऋणाची आठवण!

ईश्वरप्राप्तीसाठी जे दीर्घकालीन साधना करतात त्यांना ह्यऋषीह्व म्हणतात. ऋषी हा शब्द ऐकताच आपले हात आपोआप जोडले जातात आणि मस्तक आदराने झुकते. विविध योगमार्गांनी साधना करून ऋषींनी धर्माचरण आणि साधना यांचा समाजात प्रसार केला आणि समाजाला सुसंस्कृत केले. वेद, उपनिषद, स्मृती, पुराणे यांसारखे प्राचीन धर्मग्रंथ त्यांनी रचले.

हिंदू धर्मानुसार मनुष्यजन्मातील चार ऋणांपैकी ऋषिऋण हे एक महत्त्वाचे ऋण मानले जाते. हे ऋण फेडण्यासाठी आणि ऋषींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ऋषीपंचमी व्रत केले जाते. भाद्रपद मासातील शुक्ल पक्षातील पंचमीला हे व्रत पाळले जाते. मासिक पाळी, अशौच आणि स्पर्शास्पशार्मुळे लागलेले दोष नष्ट करण्यासाठी स्त्रिया हे व्रत करतात. या दिवशी सकाळी स्नान करून अरुंधतीसह सप्तर्षींची (कश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि आणि वसिष्ठ) पूजा केली जाते. पाटावर तांदुळाच्या आठ पुंज्या मांडून त्यांवर आठ सुपाऱ्या ठेवतात. त्यावर कश्यपादी सप्तर्षी आणि अरुंधती यांचे आवाहन करून षोडशोपचार पूजा केली जाते. या दिवशी कंदमुळांचा आहार घ्यावा आणि बैलांच्या श्रमाचे काहीही खाऊ नये, असे शास्त्र सांगते. दुसऱ्या दिवशी सप्तर्षी आणि अरुंधती यांचे विसर्जन केले जाते. ऋषींप्रती कृतज्ञता व्यक्त करून, त्यांनी दिलेल्या अध्यात्म, विज्ञान आणि संस्कारांचे स्मरण करून या व्रताची सांगता केली जाते.

**■ रेणुका हरदास**

**नागपूर.**

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**

**मेहकर**

**(९४२१३९४३३९)**

### प्रथम तुम्हा वंदीतो..!

**कार्यारंभी गणरायाची करता**
**मनोभावे आराधना**
**विघ्ने येती पण जाती लयास**
**पूर्ण होती मनोकामना ..!**

**शक्तिदायनी जगदंबा**
**विघ्नहर्ता श्री गणेश**
**पाठीशी असता**
**चिंता करू नको नरेश !**

**श्रद्धा असावी पक्की**
**संकटी होऊ नये डळमळीत**
**अग्नीपरीक्षे विना भौ**
**तो देईल कसे झोळीत ..!**

# दात काढल्यानंतर काय काळजी घ्यावी ?



कधी कधी काही थंड खाल्ल्यामुळे तुमच्या दातांमध्ये झणझणाट होते. दात काढणे ही एक सामान्य दंत प्रक्रिया आहे ज्यामध्ये तोंडातून दात त्याच्या मुळासह काढून टाकला जातो. हे अनेक कारणांसाठी केले जाते, जसे की खोलवर किडणे, गंभीर संसर्ग, तुटलेला किंवा कमकुवत दात किंवा कधीकधी ऑर्थोडोंटिक उपचारांसाठी.

दात काढण्याचे दोन मुख्य प्रकार आहेतः साधे काढणे, जिथे दात सहज दिसतो आणि सामान्य स्थितीत असतो आणि शस्त्रक्रिया काढणे, जिथे दात मुळाशी असतो किंवा तोंडात बसलेला असतो आणि त्यासाठी किरकोळ शस्त्रक्रिया आवश्यक असतात. ही प्रक्रिया सुरक्षित आहे आणि आधुनिक दंत तंत्रांमुळे, वेदना आणि संसगार्चा धोका खूप कमी आहे.

दात काढण्याचे अनेक फायदे आहेत. सर्वप्रथम, ते तोंडाचा संसर्ग आणि वेदना कमी करते. कुजलेला किंवा कमकुवत दात आजूबाजूच्या दातांवर देखील परिणाम करू शकतो, जो संपूर्ण तोंडाचे आरोग्य सुधारण्यासाठी काढता येतो.

याशिवाय, तोंडाच्या शस्त्रक्रिया किंवा ऑर्थोडोंटिक उपचारांसाठी जागा मोकळी करण्यासाठी दात देखील काढले जातात. तथापि, त्याचे काही धोके देखील आहेत. यामध्ये संसर्ग, दीर्घकाळ रक्तस्त्राव, सूज, वेदना आणि कधीकधी नसा किंवा मुळांना दुखापत होऊ शकते.

म्हणून, डॉक्टरांचा योग्य सल्ला आणि योग्य काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. आरोग्य तज्ञांच्या मते, दात काढल्यानंतर योग्य काळजी घेतल्यास लवकर बरे होण्यास मदत होते. दात काढल्यानंतर काही काळ हलका रक्तस्त्राव होणे सामान्य आहे, म्हणून त्यावर कापूस लावा. पहिले २४ तास गरम पाणी किंवा गुळण्या टाळा.

गरम किंवा मसालेदार अन्नाऐवजी मऊ आणि हलके अन्न खा. धूम्रपान आणि मद्यपान टाळा, कारण ते जखमेवर परिणाम करू शकतात. वेदना किंवा सूज आल्यास, डॉक्टरांनी सांगितलेले वेदनाशामक औषध वापरा. ब्रश किंवा फूड फ्लॉस थेट जखमेवर लावू नका. हळूहळू सामान्य टूथब्रशिंग आणि माउथवॉशिंग सुरू करा. या काळात डॉक्टरांच्या सूचनांचे पालन करणे सर्वात महत्वाचे आहे.

**या गोष्टी लक्षात ठेवा.**

पुरेसे पाणी प्या.

आंबट किंवा मसालेदार पदार्थ टाळा.

जर जखमेतून जास्त रक्तस्त्राव होत असेल तर ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.

डॉक्टरांनी सांगितलेल्या वेळेचे पालन करा.

जर तुम्हाला काही असामान्य लक्षणे किंवा तीव्र वेदना जाणवत असतील तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# कृत्रिम फुलांमुळे शेतकरी संकटात

## कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी

मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी



राज्यात ऊद्यापासून गणेशोत्सवाला सुरवात होत आहे. घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी आरास व मखर तयार करण्याकरीता मोठ्या प्रमाणावर फुलांचा वापर केला जातो. मात्र, शेतकऱ्यांनी शेतात पिकविल्या नैसर्गिक फुलांऐवजी चीन मधून आयात केलेल्या प्लास्टिक अथवा सिंथेटिक पदार्थांपासून बनवलेली कृत्रिम फुले मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहेत. हा वापर शेतकऱ्यांच्या आर्थिक ऊत्पन्नावर विपरीत परिणाम करणारा तर आहेच, परन्तु पर्यावरणालाही हानीकारक आहे.

या पार्श्वभूमीवर कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पुढाकाराने पर्यावरण, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री पंकजा मुंडेंना यासंदर्भात पत्र देत कृत्रिम फुलांच्या वापरामुळे शेतकऱ्यांवर ओढवलेल्या आर्थिक संकटातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी, शेतकरी हितास्तव पर्यावरण विभागामार्फत आवश्यक कायदेशीर उपाययोजना करत कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे.

कृत्रिम फुलांच्या वापरामुळे फुल शेती धोक्यात येऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे तसेच हरीतगृहे नष्ट होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ लागले आहे. आजच्या काळात विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये कृत्रिम (प्लास्टिक-सिंथेटिक) फुलांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. हे फुले दिसायला आकर्षक असली, तरी त्यांचा पर्यावरणावर आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे याचं गांभीर्य लक्षात घेता शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुढाकार घेत पंकजा मुंडेंना पत्र लिहित कृत्रिम फुलांच्या विक्रीवर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

# कोकणवासियांना बाप्पा पावला; बहुचर्चित रो रो सेवा एक सप्टेंबर पासून

## दक्षिण आशियातील सर्वात जलद रो-रो सेवा- नितेश राणे

मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी

गणेशोत्सव, होळी अशा विविध सणांनिमित्त कोकणवासीय कोकणात मुक्कामी जातात. त्यांचा प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी राज्य शासनाने मुंबई ते (जयगड) रत्नागिरी आणि मुंबई ते (विजयदुर्ग) सिंधुदुर्ग रो-रो सेवा सुरू केली असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुंबई ते कोकण समुद्रामार्गे प्रवास करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या रो-रो सेवेची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी कोकणवासीयांना आणि पर्यटकांना या वाहतुक सेवेमुळे मोठा दिलासा मिळणार असल्याचे राणे यांनी सांगितले.

केंद्रीय शिपींग मंत्रालय आणि राज्याच्या बंदरे विभागाने या जलवाहतूक सेवेस अंतिम मंजूरी दिली आहे. या रो-रो सेवेसाठी अत्यावश्यक असणाऱ्या एकूण १४७ परवानग्या प्राप्त झाल्या असून, यामुळे कोकणवासीयांचा अतिशय सुरक्षित व जलद प्रवास होणार आहे. हवामानाच्या बदलामुळे मच्छिमारांनाही समुद्रात जाण्यासाठी सतर्कतेचा इशारा देण्यात आला असल्याने हवामान सुरळीत होताच प्रत्यक्ष प्रवाशांसाठी ही रो-रो सेवा १ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे.



### अडीच हजारांपासून तिकिट सुरू

भाऊचा धक्का ते जयगड तीन तास तर भाऊचा धक्का ते विजयदुर्ग पाच तास प्रवास करता येणार आहे. येथे जेट्टीची सुविधा असून, जेट्टीवरून शहरात जाण्यासाठी बसेसची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. २५ नॉट्स स्पीडची ही एम टू एम नावाची रो-रो बोट असणार आहे जी दक्षिण आशियातील वेगवान बोट आहे. यामध्ये इकोनॉमी वर्गात ५५२ आसनांची व्यवस्था, प्रिमीयम इकोनॉमी मध्ये ४४, बिझनेस मध्ये ४८, तर फस्ट क्लासमध्ये १२ प्रवाशांची क्षमता असणार आहे. तर, ५० चार चाकी, ३० दुचाकी क्षमता असलेली ही रो-रो आहे.

यासाठी कोकणवासीयांना इकोनॉमी क्लाससाठी २ हजार ५०० रूपये दर आकारला जाणार आहे. तर, प्रिमियम इकोनॉमीसाठी प्रवाशांसाठी ४ हजार रूपये, बिझनेस क्लाससाठी ७ हजार ५००, फस्ट क्लाससाठी ९ हजार रूपये दर आकारला जाणार आहे. तसेच, चार चाकीसाठी ६ हजार तर, दु-चाकीसाठी १ हजार , सायकलसाठी ६०० , मिनी बससाठी १३ हजार आणि बसच्या आसनक्षमतेप्रमाणे दर वाढत जाणार आहेत. भविष्यात श्रीवर्धन, मांडवा असे विविध थांबे असणार आहेत तर त्यासाठी जेट्टीही तयार करण्यात येणार असल्याची माहिती नितेश राणे यांनी दिली.

# कचरा वेचणाऱ्या निराधार महिलेला 'दर्द से हम दर्द तक' ट्रस्टचा आधार, 8 महिन्यानंतर जामिनावर मुक्तता

मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी

कल्याण- मुरबाड पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी कचरा वेचणाऱ्या सुरेखा रमेश वानखेडे @ जीजा गणपत शेजूळ हिस भारतीय दंड संहिता ३१३, ३२३, ३७६, ३७६ (२) (न) ५०६ तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२ अंतर्गत अटक केली होती. २०१९ ते २०२२ या कालावधीत सदर आरोपीने मुख्य आरोपीला गुन्ह्यामध्ये साथ दिल्याचा आरोप करण्यात आला होता. गरिबीमुळे व अन्य कुणी नातेवाईक नसल्याने ती स्वतः साठी वकील करू शकली नाही. संस्थेच्या स्वयंसेवक साक्षी शेट्ये यांना त्या भायखळा महिला कारागृहात भेटल्या व कायदेशीर मदत मागितली

वैद्यकीय अहवालानुसार घडलेल्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वैद्यकीय पुरावा सापडून आला नाही. तसेच सदर गुन्ह्यामध्ये कोणताही वैयक्तिक साक्षीदार मिळून आला नाही. गुन्हा दाखल झाल्यावर आरोपीस अटक करून न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले असे संस्थेच्या वतीने नियुक्त केलेल्या एड. श्रीकृष्ण खैरनार यांनी कोर्टात म्हणणे मांडले.

आरोपीच्या जामिनासाठी दाखल अर्जावर एडवोकेट श्रीकृष्ण खैरनार, दर्द से हमदर्द तक ट्रस्ट (लीगल एड एन जी ओ) यांनी नि:शुल्क (प्रो बोनो) पद्धतीने जोरदार युक्तिवाद सादर केला. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून माननीय अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती. वर्षाराणी ए. पत्रावळे (६ वे अतिरिक्त सत्र न्यायालय, कल्याण ) यांनी दि. ११.०८.२०२५ रोजी आदेश दिला. प्रथमदर्शी न्यायालयाने असे नमूद केले की, पिडीत आता विवाहित असून वेगळी राहत आहे. न्यायालयाने नमूद केले की आरोपीचे कोणतेही पूर्व गुन्हेगारी रेकॉर्ड नाही, तपास पूर्ण होऊन कोणत्याही प्रकारचे पुरावे सापडून आले नाहीत, आरोपी ७ महिने तुरुंगात आहे व खटला निकाली यायला वेळ लागणार आहे; कायद्याचा मुलभूत सिद्धांत "जामीन हा नियम; तुरुंगवास अपवाद" लागू होतो.

न्यायालयाने कडक अटींसह जमीन मंजूर केला असून आरोपीने रु. २५,०००/- चे वैयक्तिक हमीपत्र व त्याच किमतीचे एक किंवा दोन जामीनदार उभे करणे, पुराव्याशी छेडछाड न करणे, साक्षीदारांवर थेट व अप्रत्यक्ष दबाव न आणणे आणि सुनावणीस नियमित हजेरी लावणे बंधनकारक आहे. मुरबाड पोलिसांनी जामिनास विरोध दर्शविताना आरोपी स्थायी रहिवासी नसल्याने तसेच आरोपी कचरा वेचण्याचे काम करत असल्याने पळून जाण्याची शक्यता व साक्षीदारावर दबाव येऊ शकतो अशी मांडणी केली होती. तथापि न्यायालयाने वरील अटींवर जामीन मंजूर केला.

या निर्णयानंतर आरोपी सुरेखा रमेश वानखेडे @ जिजा गणपत शेजूळ हिची जामिनावर सुटका प्रक्रियेनुसार होणार असून खटला न्यायालयात पुढे चालू राहील. बचाव पक्षाची बाजू एडवोकेट श्रीकृष्ण खैरनार (दर्द से हमदर्द तक ट्रस्ट) यांनी प्रो बोनो सेवा देत मांडली, हे विशेष उल्लेखनिय ठरले.

# राष्ट्रवादी शरद पवार गटाची मोखाडा तालुका कार्यकारिणी बरखास्त

मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी

पालघर जिल्ह्यात एकीकडे राजकीय वातावरण तापताना दिसत आहे. महायुतीतील प्रमुख घटक पक्ष एकमेकांची प्रतिनिधी फोडताना दिसत आहे. तर आता अचानकपणे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाची मोखाडा तालुका कार्यकारणी बरखास्त केली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार सुनील भुसारा यांनी दिली आहे.

माजी आमदार सुनील भुसारा यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी त्यांची निवड झाली आहे. यानंतर लवकरच पालघर जिल्ह्यात जिल्हा कार्यकारिणी सुद्धा नवीन होईल की काय याबाबत अनेक चर्चा राजकीय गोटातून होत असताना. अचानक पणे भुसारा यांनी मोखाडा तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची कार्यकारणी बरखास्त करत असल्याचे जाहीर केले. तालुकाध्यक्ष, शहर अध्यक्ष ,ओबीसी सेल, युवक अध्यक्ष विद्यार्थी अध्यक्ष आदी संपूर्ण कार्यकारिणीच रद्द झाल्याचे सांगण्यात आले असून गणेश चतुर्थी दिवशी नवीन कार्यकारिणीचा श्री गणेशा करणार असल्याची माहिती यावेळी भुसारा यांनी दिली.

अवघ्या काही महिन्यावर पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषदांच्या निवडणुका होणार आहेत अशावेळी संपूर्ण जिल्ह्यात पळवा पळवीचे वातावरण आहे. त्या पार्श्वभूमीवर नव्या चेहऱ्यांसह निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे भुसारा यांनी सांगितले.

# गणेशोत्सव-2025 करिता बदलापूर नगरपरिषदेची जय्यत तयारी

बदलापूर, दि.२६,प्रतिनिधी

गणेशोत्सव-2025 करिता कुळगांव बदलापूर नगरपरिषद सज्ज झाली असून शहरातील घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडणेकरिता पालिकेमार्फत करावयाच्या आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. दि. 25/08/2025 रोजी मुख्याधिकारी श्री. मारुती गायकवाड यांनी बांधकाम विभागातील अभियंते, विद्युत अभियंता तसेच आरोग्य अधिकारी यांच्या समवेत सर्व विसर्जन ठिकाणांची संयुक्त पाहणी करुन संबंधितांना आवश्यक त्या सुचना केल्या.

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेकडून गणेश विसर्जनाकरिता बदलापूर पूर्वेला 6 व पश्चिमेला 2 अशा एकुण 8 कृत्रिम तलावांची निर्मीती करण्यात आली असून, सर्व गणेश मुर्तीच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावांचा वापर करण्यासाठी आवाहन करण्यात येत असून गणेशमुर्ती दान करणेबाबत प्रोत्साहीत करणेत येत आहे.शहरात एकुण 13 नैसर्गिक व 8 कृत्रीम तलाव अशा एकुण 21 ठिकाणी विसर्जन व्यवस्था करण्यात आलेली आहे. वरिल सर्व ठिकाणी निर्माल्य कलश ठेवण्यात येणार आहेत.



शहरातील सर्व आगमन व विसर्जन मार्गावरील खड्डे भरण्याचे काम सुरु असून रस्ते सुस्थितीत ठेवणेकरिता कुबनपच्या बांधकाम विभागातील सर्व अभियंता मुख्याधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने काम करीत आहेत.कुबनप विद्युत विभागामार्फत शहरातील सर्व विसर्जनाच्या ठिकाणी पुरेपुर विद्युत व्यवस्था पुरविण्याचे नियोजन करण्यात आले असून शहरातील प्रमुख रस्त्यांवर लावण्यात आलेले स्ट्रिट लाईट दुरुस्त करण्यात आले आहेत. तसेच श्री गणेश मुर्तीना व विद्युत तारांना अडथळा होऊ नये याकरिता झाडांच्या फांद्याची छाटणी करण्यात आलेली आहे.

विसर्जनाच्या ठिकाणी विसर्जन सुरळीत व शांततेत पार पाडण्याकामी स्टेज, मंडप, स्पिकर तसेच तात्पुरत्या स्वरुपात CCTV ची व्यवस्था करणेबाबत नियोजन करण्यात आले आहे.शहरातील सर्व विसर्जन ठिकाणी कुबनप कर्मचारी, अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून शहरातील स्वयंसेवी संस्थांचे सहकार्याने विसर्जन कार्यक्रम व्यवस्थित पार पाडणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत. यावेळी कुळगांव बदलापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड नगर अभियंता विजय पाटील आरोग्य विभाग प्रमुख श्रेया शिर्वटकर, विद्युत अभियंता अभिजीत ताम्हाणे तसेच बांधकाम विभागातील अभियंते व इतर कर्मचारी यांच्या समवेत सर्व विसर्जन स्थळांची संयुक्त पाहणी करण्यात आली आहे.

**ग्रुप ग्रामपंचायत दातली**
**ता. सिन्नर, जि. नाशिक**
**जाहीर निविदा सुचना**

सरपंच ग्रुप ग्रामपंचायत दातली, ता. सिन्नर, जि. नाशिक हे पाणी पुरवठा निधीतून खालीलप्रमाणे बी-१ निविदा जिल्हा परिषदेच्या नोंदणीकृत मक्तेदाराकडून मागवत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | बयाना रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|
| १. | दातली येथे पाण्याची टाकी बांधणे. | २,००,०००/- | २,००० | ३०० |

स्वीकारण्यात येतील. २) मोहरबंद निविदा दि. ०३/०९/२०२५ रोजी सकाळी १०:०० वा. उघडण्यात येईन.

अटी व शर्तीः १) सदर निविदा दि. २७/०८/२०२५ ते ०२/०९/२०२५ रोजी सुट्टीचे दिवस वगळून दुपारी ५ वाजेपर्यंत ३) जीएसटी प्रमाणपत्र, पेन कार्ड, नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक. ४) बांधकाम प्रलंबित नसल्याचा दाखला जोडणे आवश्यक. ५) कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारण्याचा / नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे.

**सही. - ग्रामसेवक अधिकारी सही. - सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत दातली ता. सिन्नर, जि. नाशिक**

## आज का अंदाज

बुधवार २७ ऑगस्ट २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ८ | ४ | ५ | ६ | ९ |
| १५५ | २३७ | २५८ | १७० | १५८ | ६९० | १७८ | २३४ |
| २९० | ५७० | ३५७ | ३६९ | ३४७ | ७८० | ३५८ | ४५० |
| ३८० | ६६० | ४५६ | २६० | २३९ | ५०० | २५९ | ३७९ |
| १० | २० | ५७ | ८७ | ४८ | ५८ | ६० | ९० |
| १४ | २४ | ५३ | ८३ | ४१ | ५१ | ६२ | ९२ |
| १६ | २६ | ५९ | ८९ | ४३ | ५३ | ६७ | ९७ |

**२७ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ६१ | ७८ | ०८ |
| ३५ | ६५ | ७४ | ०४ |
| ३९ | ६९ | ७२ | ०२ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

२ ५ ४ ३ ७

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# अंबुजा सिमेंट्सच्या आफ्टर स्कूल प्रोग्रॅममुळे नागपूरजवळील ग्रामीण खेडेगावात क्रीडा प्रतिभेला मिळाली चालना

**नागपूर, २६ ऑगस्ट :** वैविध्यपूर्ण अदानी पोर्टफोलिओची सिमेंट आणि बांधकाम साहित्य कंपनी अंबुजा सिमेंट्स आपल्या आफ्टर स्कूल प्रोग्रॅम या सीएसआर उपक्रमाचा एक भाग म्हणून महाराष्ट्रातील चंद्रपूर येथे ग्रामीण विद्यार्थ्यांना खेळ आणि शारीरिक तंदुरुस्ती साध्य करण्यासाठी सक्षम करत आहे. या उपक्रमाचा उद्देश प्रतिभा आणि खेळांमध्ये रुची असलेल्या मुलांसाठी सुसूत्र प्रशिक्षण, स्पर्धांमध्ये भाग घेण्याची संधी आणि जीवन कौशल्यांबाबत मार्गदर्शन पुरविणे हा आहे.

लखमापूर येथील जिल्हा परिषद अपर प्राथमिक शाळेतील हुशार आणि उत्साही विद्यार्थिनी खुशीसाठी हा कार्यक्रम आयुष्य बदलणारा ठरला आहे. खेळाच्या मैदानाच्या मर्यादित सोयीसुविधा आणि नियमित प्रशिक्षणाचा अभाव असूनही तिने आपल्या खेळाच्या आवडीला चिकाटीने जोपासले. अंबुजा सिमेंट्सच्या उपक्रमामुळे तिला तांत्रिक प्रशिक्षण, पोषणविषयक जागरूकता आणि तालुका व जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. या अनुभवामुळे तिचा आत्मविश्वास वाढला, तिच्यामधील शिस्त आणखी वाढली आणि क्रीडा कौशल्ये अधिक मजबूत झाली.

खुशी आता केवळ शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील उत्तम कामगिरी करणारी विद्यार्थिनी म्हणूनच नव्हे तर आपल्या सहाध्यायींसाठी आदर्श, प्रेरणादायी व्यक्तीही बनली आहे. तिने नेतृत्वगुण विकसित केले आहेत, ती इतर मुलांना खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करते आणि आपली क्रीडा क्षेत्रातील वाटचाल गंभीरपणे पुढे नेण्याचा तिचा निर्धार आहे.

खुशीसारख्या मुलांना प्रशिक्षण, अनुभव मिळण्याची संधी आणि प्रोत्साहन देऊन अंबुजा सिमेंट्स ग्रामीण युवकांना त्यांची क्षमता खुली करण्यास आणि शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात संतुलित भविष्य घडविण्यास सक्षम करत आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस अत्यंत शुभ असेल. तुम्हाला तुमच्या कामात अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळेल. नोकरी करणाजयांना प्रमोशन किंवा पगारवाढीची संधी मिळू शकते. व्यावसायिकांना नवीन करार मिळतील.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी काही नवीन लोक भेटतील. आज तुमच्या वैयक्तिक प्रयत्नांना मोठे यश मिळेल. आर्थिक स्थिती सुधारेल.

**मिथुन :** कुटुंबासोबत आनंदाचे क्षण घालवाल. मात्र, आरोग्याची काळजी घ्या. आज तुम्ही सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होऊ शकता. आर्थिक बाबतीत सावध राहा. अनावश्यक खर्च टाळा.

**कर्क :** जोडीदारासोबत काही मतभेद होण्याची शक्यता आहे, त्यामुळे बोलताना संयम ठेवा. तुमचे जवळच्या व्यक्तींसोबतचे नाते अधिक घट्ट होईल. आरोग्यासाठी नियमित व्यायाम करणे फायदेशीर ठरेल.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला राहणार आहे. आज तुम्हाला व्यवसायात आर्थिक फायदा होईल पण जास्त खर्च देखील होऊ शकतो. आज तुम्हाला अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी अत्यंत शुभ असेल. तुम्हाला अपेक्षित यश मिळेल. जुन्या मित्रांची अचानक भेट होईल, ज्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** आजचा दिवस उत्साहाचा आणि सकारात्मकतेचा असेल. तुमच्या नवीन कल्पनांना चांगला प्रतिसाद मिळेल. सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्याल. त्यामुळे तुमचा मान वाढेल.

**वृश्चिक :** आत्मविश्वासात आज लक्षणीय वाढ होईल. तुमच्या कामामुळे आणि नेतृत्वगुणांमुळे तुम्ही इतरांवर चांगला प्रभाव पाडाल. तुमच्या कामाची प्रशंसा होईल. लव्ह लाइफमध्ये सकारात्मक बदल होतील.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. आज तुम्ही तुमची नोकरी बदलण्याचा प्रयत्न कराल आणि त्यात यश मिळण्याची शक्यता आहे. आज तुमचा पगार वाढेल, आर्थिक स्थितीत संतुलन राहील.

**मकर :** कुटुंबासोबत वेळ घालवल्याने मानसिक शांतता मिळेल. प्रवासामुळे नवीन संधी मिळतील. ज्यामुळे भविष्यात फायदा होईल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला आहे. अभ्यासात यश मिळेल.

**कुंभ :** आज आर्थिक लाभ होण्याची दाट शक्यता आहे. जुन्या गुंतवणुकीतून चांगला परतावा मिळेल. कामाच्या ठिकाणी तुमचे वरिष्ठ तुमच्या कामावर खुश असतील. कौटुंबिक बाबींमध्ये थोडे लक्ष द्यावे लागेल.

**मीन :** आजचा दिवस काहीसा आव्हानात्मक असू शकतो. कामाच्या ठिकाणी काही समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी जाणकार व्यक्तींचा सल्ला घ्या.

## शब्दकोडे क्रमांक २२०२



**आडवे शब्द :-**
१) अतिशय कृपण, नीच, कृतघ्न माणूस (वा.प्र.)
८) सेवक
१०) रममाण, तल्लीन
११) मजबूत
१३) श्रीविष्णूचे एक नाव
१५) चांदणी
१७) देणारा
१८) तंबाखूचे सुगंधी चूर्ण
२०) विरोध, अडथळा
२२) सरकारी नियम
२४) फिकीर
२५) कच्चे लिखाण (इं.)
२६) लोणच्यातील तेलमसाला
२७) जन्मदाता
२९) लोककथा
३०) पाचवारी लुगडे
३१) सिंह
३२) अभिप्राय
३३) पुष्कळ
३४) लोखंडाला आकर्षित करणारा
३५) श्रीविष्णूचे एक नाव
३६) मरण्याची स्थिती, नाश पावलेला भाग
३८) हिंदीत सर्व
३९) धपाटा
४०) धडधड (हिं.)
४१) भीती
४३) कहाणी
४५) शाश्वत, चिरकाल टिकणारा
४६) शोक, दु:ख (उर्दू)
४८) एकूणएक, सर्व
५०) सत्ताविसावे नक्षत्र
५२) बनारस
५३) पिकांवर पडणारा एक रोग
५४) चित्रपटाचा पडदा
५६) मज्जाव, बंदी
५७) कट्टा
५८) चमक, मुरगळा
५९) लाकूड कापण्याचे हत्यार
६१) आश्रय
६२) मोठा जाड अंगरखा
६३) संपत्ती
६४) खटला
६६) मोठे माकड
६७) द्रव्य, पैसा
६९) लोखंड घासण्याचे हत्यार
७०) वजन
७१) स्त्रीपिशाच्च, हडळ
७२) इंद्राणी
७३जास्तीत जास्त

**उभे शब्द :-**
१) डोके (ग्रा.)
२) वरपांगी
३) पद्धत
४) उल्का पडून तयार झालेले महाराष्ट्रातील एक सरोवर
५) पलंग
६) वहिवाट, जाणे येणे
७) चुका करत करत
९) किरकोळ सामान
१२) गाडीचे छत
१४) मोठे गाव
१५) घाई, त्वरा
१६) चुलता
१७) मोठा भाऊ
१९) पोपट
२१) पैशाशी पैसा जोडणारा, कंजूष
२३) काळपुरुष
२४) सर्वस्व
२६) विशेष
२८) चटकन त्वरित
३०) धैर्य, हिंमत
३१अ) *** ** ** *** तरी लाज राख एक वाकप्रचार
३३) विवाह विच्छेद
३६) मधुमक्षिका
३७) अवघड, कष्टप्रद त्रासदायक
४२) लक्ष्मी
४४) हवा खाण्यासाठी जागेत बदल
४७) चार आठवडे
४९) दहावी रास
५१) धनुष्यबाण
५५) एकाग्र नजर
५६) मत देण्याची क्रिया
५७) मर्यादा
६०) फळातील द्रवपदार्थ
६२) शुष्क, चाबूक
६५) दिवस
६७) पोशिंदा, मालक
६८) कावळा
६९) आजच्या आधीचा दिवस

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महत्त्वाचे

### येवला- लासलगाव मतदार संघातून मुंबई आंदोलकांना जाणार भाकरी आणि भाजी

**विंचूर ।** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली २९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या आंदोलनात सहभागी होणाऱ्या लाखो मराठा बांधवांसाठी, विशेषतः 'एक भाकर समाजासाठी' या अनोख्या उपक्रमातून मदतीचा हात पुढे करण्यात येत आहे. येवला-लासलगाव मतदारसंघातही या उपक्रमाला प्रचंड पाठिंबा मिळत असून, मराठा समाजबांधवांनी एकत्र येत आंदोलनाचे यशस्वी नियोजन केले आहे. येवला आणि लासलगाव मतदारसंघातील सकल मराठा समाजाची नुकतीच भरवस फाटा येथे एक महत्त्वाची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत मुंबईतील आंदोलनासाठीच्या तयारीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आपल्या हक्कांसाठी लढणाऱ्या बांधवांना कोणत्याही परिस्थितीत उपाशी राहावे लागणार नाही, याची काळजी घेण्यासाठी 'एक भाकर समाजासाठी' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत गावागावातून भाकरी आणि चटणी/भाजी गोळा करून मुंबईत आंदोलस्थळी पाठवण्यात येणार आहे. या बैठकीत शाहूराजे शिंदे, सचिन आहेर, प्रवीण कदम, शिवा सुराशे, गोपीनाथ ठुबे, केदार नवले, प्रसाद फापाळे, पंडित मुदगुल, राकेश फापाळे, पवन फापाळे, विक्रम शिंदे, दत्ता दरेकर, अभिजीत डुकरे, अमित मुदगुल, संदीप फापाळे, केदार फापाळे, योगेश भोसले, हर्षल काळे, तुषार थेटे, विजय मुदगुल यांच्यासह अनेक मराठा बांधव उपस्थित होते.

### नांदगाव; पळाशी शिवारात बिबट्याची दहशत

**नांदगाव ।** तालुक्यातील पळाशी व परिसरात बिबट्याचा संचार सुरू असून नागरिक भयभयीत झाले आहेत. पळाशी येथे बिबट्याने तीन वासरे,



कुत्रे, शेळ्या आधी पाळीव जनावरांची फरशा पाडला आहे त्यामुळे शेतकरी व शेतमजूर वर्गामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने पिंजरा लावून त्यांना पकडावे अशी मागणी पळशी गावातून व परिसरातून होत आहे. पळाशी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर मका व इतर पिके वाढलेली असल्याने व त्यांना लपण्यासाठी जागा असल्याने असल्याने बिबट्या मुक्त संचार करत आहे. या भागातील पाळीव प्राणी, वासरे, कुत्रे, शेळ्या, डुक्कर अशी जनावरे खाद्य मिळत असल्याने बिबट्याचा मुक्काम सध्या या भागात आहे. सध्या खरीप हंगाम सुरू असून कांदा लागवड करणे, पिकांना पाणी देण्याचे काम सुरू आहे. तालुक्यातील पळाशी शिवारातील पंढरीनाथ आव्हाड व राजेंद्र आव्हाड यांच्या शेतात बिबट्याची दर्शन झाल्याने वन विभागाला तात्काळ माहिती दिली. पळशी येथे दिनांक २२ऑगस्ट रोजी वनविभागाचे वनसंरक्षक संतोष दराडे, अमोल पाटील, विष्णू राठोड यांनी भेट देऊन शेतातील बिबट्याच्या पाऊलखुणांची पाहणी केली. शेतातील बिबट्याच्या मागच्या पायांचे ठसे असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. वन विभागाच्या वतीने दोन पिंजरे लावण्यात आले आहेत. पळाशी, तळवाडे, मूळडोंगरी परिसरामध्ये बिबट्याची दहशत पसरले असून शेतशिवारातील कामे खोळंबोली आहेत. वनपरिक्षेत्रात वन विभागाच्या वतीने दिवस रात्र वस्तीवर भर देण्यात येत आहे अशी प्रतिक्रिया वनपरिक्षेत्र अधिकारी हेमंत कोकाटे नांदगाव यांनी दिली आहे.

### कळवणला साकारतय कामाख्या मंदिराचा देखावा

**कळवण ।** कळवण पंचक्रोशीत प्रख्यात श्री ओम गणेश मित्र मंडळाची स्थापना १९७६ साली झाली आहे. मंडळाला यंदा पन्नास वर्ष पुर्ण होत आहेत. या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्ताने मंडळातर्फे देवीच्या ५१ शक्तीपीठांपैकी एक



असलेल्या श्री कामाख्या देवीच्या मंदिराचा प्रतिकृती देखावा तयार करण्याचे काम सुरु असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष रमेश शिरसाठ यांनी पत्रकार परिषदेत दिली. मंडळाबाबत माहीती देतांना श्री शिरसाठ यांनी सांगीतले की, गेल्या पाच दशकांत मंडळाने आता पर्यंत उत्तर महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री सप्तश्रृंगी देवीचा देखावा, श्री अमरनाथ गुफा, श्री क्षेत्र पंढरपुर विठ्ठल रुक्मिणी मंदिर, महाभारत या सारखे धार्मिक व ईतर सामाजिक व समाज प्रबोधनात्मक देखावे सादर केले आहेत. पन्नास वर्षांच्या प्रवासात मंडळाने विविध आकर्षक तसेच समाजप्रबोधनपर देखावे सादर करून गणेशोत्सवाला वेगळे वैशिष्ट्य प्राप्त करून दिले आहे. त्यामुळे गणेशभक्तांमध्ये या मंडळाच्या उपक्रमांविषयी उत्सुकता असते. तसेच तालुक्यातील, राज्यातील व देशपातळीवरील नैसर्गिक आपत्तीत नेहमीच आर्थिक व वस्तुरुपात मदतीचा हात दिला आहे. हे ह्या मंडळाचे खास वैशिष्ट्य आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त यंदा मंडळाने प्रसिद्ध कामाख्या देवी मंदिराचा देखावा साकारला आहे. त्यामुळे स्थानिक व परिसरातील नागरिकांना या मंदिराचे दर्शन घेण्याची अनोखी संधी मिळणार आहे. हे शिल्प नाशिक येथील वास्तुविशारद महेश शेळके साकार करीत आहे.

# आदर्श समाज निर्मितीसाठी महिलांचे योगदान श्रेष्ठ : ॲड. नितीन ठाकरे



**नाशिक ।** सर्वच क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या महिला ह्या पुरुषांपेक्षा काकणभर सरसच आहेत. आजच्या काळात सुदृढ आणि संपन्न समाज निर्मितीमध्ये महिलांचे योगदान अतिशय श्रेष्ठ आहे, असे प्रतिपादन मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या महाराष्ट्र राज्य गिरजा महिला मंचच्या वतीने मविप्रच्या गंगापूर रोडवरील आयएमआरटी ऑडीटोरियममध्ये महिलांसाठी आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी ते बोलत होते. मंचावर ज्येष्ठ साहित्यिक विवेक उगलमुगले, सुहास टिपरे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार, कार्याध्यक्ष रवींद्र मालुंजकर, गिरजा मंचच्या जिल्हाध्यक्ष शितल कुयटे, राज्य सरचिटणीस भारती निकम, भाग्यश्री चौधरी उपस्थित होते.

ॲड.ठाकरे पुढे म्हणाले की, कौटुंबिक जबाबदारी सांभाळून नव्या युगाचे स्वागत करण्यासाठी आजची महिला सदैव सज्ज आहे. स्त्री-पुरुष समानता खऱ्या अर्थाने आता समाजात रुजू लागली आहे. ही नव्या युगाची नांदी आहे, असेही ते म्हणाले. राज्यभरातील सुमारे शंभरहून अधिक महिलांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. राज्य बाल हक्क आयोगाच्या सदस्या सायली पालखेडकर, प्राचार्य डॉ.प्रशांत सूर्यवंशी यांच्या हस्ते स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. ज्येष्ठ साहित्यिक उगलमुगले आणि सविता पोतदार यांनी परीक्षण केले. श्रुती बोरस्ते (प्रथम), अश्विनी सांगळे (द्वितीय), श्रावणी बच्छाव (तृतीय), शरयू सोनवणे-भागवत आणि प्रियंका बुब (उत्तेजनार्थ) यांना स्व. विमलाबाई टिपरे यांच्या स्मरणार्थ सुहास टिपरे यांच्या वतीने रोख पारितोषिके देऊन सन्मानीत करण्यात आले. भाग्यश्री चौधरी यांनी प्रास्ताविक केले. सविता वैद्य यांनी सूत्रसंचालन केले. कांचनमाला हुजरे यांनी आभार मानले. गिरजा महिला मंचच्या बागलाण तालुकाध्यक्षा स्वाती सोनवणे, निफाड तालुकाध्यक्षा कल्पना माने, येवला तालुकाध्यक्षा संगीता महाजन, चांदवड तालुका प्रतिनिधी वंदना गांगुर्डे, निफाड तालुका कार्याध्यक्ष वैशाली शिंदे, विद्या वाघमारे, संगीता महाजन आदी गिरजा महिला मंचच्या पदाधिकारी, सदस्या उपस्थित होत्या.

# पंचायत विकास निर्देशांकात नाशिक जिल्हा परिषदेचा राज्यात पहिला क्रमांक




**नाशिक ।** नाशिक जिल्हा परिषदेने आणखी एक अभिमानाची कामगिरी नोंदवली आहे. पंचायत राज मंत्रालय भारत सरकार आणि ग्रामविकास व पंचायतराज विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त उपक्रमांतर्गत २०२२-२३ या वर्षासाठी झालेल्या पंचायत विकास निर्देशांक मूल्यमापनात नाशिक जिल्हा परिषदेने संपूर्ण राज्यात अव्वल क्रमांक पटकावला आहे.

शाश्वत विकास ध्येयांचे स्थानिकीकरण या महत्त्वपूर्ण संकल्पनेखाली पंचायत विकास निर्देशांकाच्या माध्यमातून ग्रामविकासाची पातळी मोजण्यात आली. यात विविध घटकांचा विचार करून जिल्हा परिषदांची कामगिरी तपासण्यात आली. या मूल्यमापनात नाशिक जिल्हा परिषद पहिल्या क्रमांकावर येत राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी आदर्श ठरली आहे. या यशाबद्दल नाशिक जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांचे कौतुक होत असून, ग्रामीण विकासाच्या दिशेने केलेल्या एकत्रित प्रयत्नांना ही यशस्वी परंपरा लाभली असल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रमाणपत्रावर राज्य नोडल ऑफिसर आणि उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, पंचायत राज ग्रामविकास पंचायत राज सचिव एकनाथ डवले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री योगेश कदम आणि ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.नाशिक जिल्हा परिषदेच्या या यशामुळे जिल्ह्याची प्रतिष्ठा उंचावली असून, ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासासाठी हे मोठे पाऊल मानले जात आहे.

# नाशिक-दिंडोरी- कळवण रोडचे चौपदरीकरण; सुरत-चेन्नई मार्गाचे काम सुरु करावे : खा. भगरे



**नाशिक ।** नाशिक दिंडोरी वणी कळवण रस्ता चौपदरीकरण करण्याची आग्रही मागणी खासदार भास्कर भगरे यांनी केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचेकडे केली आहे.

दिल्ली येथे माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांचे उपस्थितीत केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची खासदार भास्कर भगरे यांनी नाशिक दिंडोरी वणी कळवण रस्त्याचे चौपदरीकरण, चेन्नई सुरत महामार्ग नाशिक आग्रा महामार्ग उड्डाणपुल आदी सह मतदारसंघातील रस्त्यांच्या प्रश्नावर भेट घेत सविस्तर चर्चा केली. भगरे यांनी नाशिक दिंडोरी वणी कळवण हा रस्ता अंत्यत वर्दळीचा असून सदर रस्ता अरुंद आहे. सातत्याने अपघात होत आहे. आगामी काळात सिंहस्थ कुंभमेळा होत असून गुजरात राजस्थान मधून लाखो भाविक तसेच सिंहस्थ साठी येणारे भाविक वणी सप्तशृंग गडावर येणार असल्याने सदर रस्त्याचे चौपदरीकरण होणे अत्यावश्यक असल्याचे भगरे यांनी गडकरी यांना सांगितले गडकरी यांनीही सदर रस्त्याचे चौपदरीकरण अत्यावश्यक आहे असे सांगत सिंहस्थ नियोजन मध्ये सदर रस्ता चौपदरीकरण करण्याचे निर्देश देण्यात येतील असे आश्वासित केले.

# सिटीलिंकची दोन नवीन मार्गांवर बससेवा सुरु



**नाशिक ।** सिटीलिंकच्या वतीने नाशिक शहर व शहर हद्दीपासून २० किमी पर्यंत विविध मार्गांवर बससेवा पुरविण्यात येत आहे. यातच आता सिटीलिंकच्या वतीने आणखी दोन मार्गांवर बससेवा सुरु करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून प्रवाश्यांची होत असलेली मागणी लक्षात घेता मार्ग क्रमांक १०२ एम- निमाणी ते बारदान फाटा व मार्ग क्रमांक १७१- चुंचाळे गाव ते बारदान फाटा अशा दोन मार्गांवर हि बससेवा सुरु करण्यात आली आहे. यातील मार्ग क्रमांक १०२ एम हि बस महिंद्रा ॲण्ड महिंद्रा येथे कार्यरत कर्मचाऱ्यांकरिता तर मार्ग क्रमांक १७१ ही बस चुंचाळे येथे राहणाऱ्या विद्यार्थी व कामगारांना सातपूर येथील शाळा व एमआयडीसी येथे जाण्याकरता प्रवास सोयीचा व्हावा याकरिता हे सुरू करण्यात आली आहे. या दोनही मार्गांचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे- **१) मार्ग क्रमांक १०२ एम**- निमाणी ते बारदानफाटा मार्गे सिव्हील, सातपूर, महिंद्रा गेट. बसेसची वेळ- निमाणी ते बारदान फाटा- ८:२०, ९:२०, १०:४०, ११:४०, १४:१०, १४:२०, १६:२०, १७:००; १९:२०. बारदान फाटा ते निमाणी - ७:१०, ८:१०, ९:२५, १०:३५, ११:५०, १२:५०, १५:४५, १७:२०, १८:१०. तपोवन ते बारदान फाटा- ६:००, ७:००. बारदान फाटा ते तपोवन- १७:२०, २०:४०. २) **मार्ग क्रमांक १७१**- चुंचाळे गाव ते बारदान फाटा मार्गे एक्स्लो, सातपूर, श्रमिकनगर. बसेसची वेळ- तपोवन ते चुंचाळे- ०५:०५. चुंचाळे ते बारदान फाटा- ०७:००, ०८:३०, १४:००, १६:१५, १७:४५. बारदान फाटा ते चुंचाळे- ०७:४५, १३:१५, १५:३०, १७:००, १८:४०. बारदान फाटा ते निमाणी- ०९:१५. चुंचाळे ते तपोवन- १९:२५. वरील दोनही मार्गांवरील बससेवा सोमवार दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी पासून सुरु होत आहे. तरी जास्तीत जास्त प्रवाश्यांनी या बससेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. च्या वतीने करण्यात आले आहे.

# साल्हेर किल्ला जागतिक पर्यटन, रोजगाराचे केंद्र होईल : वास्तुविशारद प्रा. कासार




**नाशिक ।** कळसुबाई शिखरानंतर महाराष्ट्रातील सर्वाधिक उंचीचा किल्ला म्हणून साल्हेर किल्ला ओळखला जातो. या किल्ल्यावर दुर्मिळ अशा १६५ वेगवेगळ्या वनस्पतींच्या प्रजाती आहेत. त्यामध्ये कार्वी ही दुर्मिळ वनस्पती असून, ती दर १२ वर्षांनी फुलते. साल्हेर किल्ल्याला युनेस्को ने महाराष्ट्रातील प्रमुख १२ किल्ल्यांमध्ये समावेश केल्याने साल्हेर किल्ला जागतिक पर्यटन व रोजगाराचे केंद्र होईल असा विश्वास वास्तूविशारद आणि पुरातत्व विद्या अभ्यासक प्रा स्मिता कासार पाटील यांनी व्यक्त केला.

के.टी.एच.एम. महाविद्यालय आय क्यू ए सी व इतिहास विभाग आयोजित साल्हेर किल्ला : जागतिक मानांकन आणि आपली जबाबदारी` या विषयावर सूक्ष्मजीवशास्त्र विभाग येथे त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ कल्पना अहिरे होत्या. व्यासपीठावर आय क्यू ए सी समन्वयक व उपप्राचार्य डॉ एन डी गायकवाड, डॉ सोमनाथ शिरसाठ, इतिहास विभागप्रमुख डॉ. संतोष शेलार उपस्थित होते. प्रा. पाटील यांनी पुढे बोलतांना साल्हेर किल्यात एकूण १५ दरवाजे , १२ गुफा , १२ पाण्याचे साठे, दगडात तयार केलेले यज्ञकुंड व ५ वेगवेगळ्या दगडांवर किल्याच्या माहिती संदर्भात सूचना नोंदविलेल्या आहेत. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांनी किल्याच्या परिसर स्वच्छतेसंदर्भात काळजी घेणे महत्वाचे आहे.या ठिकाणी जागतिक पर्यटन व रोजगार निर्मितीसाठी गिर्यारोहणाची प्रशिक्षित ट्रेकर, आपत्ती व्यवस्थापन केंद्र,कॅफे, होम स्टे, टुरिस्ट गाईड यांसारखी सुविधा होणे आवश्यक असल्याचे पाटील यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचे जागतिक मानांकन मिळाले हे आपल्या दृष्टीने मोठी गौरवस्पद बाब आहे. या प्रक्रियेत केटीएचएम महाविद्यालयाच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असे प्राचार्य डॉ. श्रीमती कल्पना अहिरे यांनी सांगितले.

# जातेगावला बैलाच्या पोटातून शस्त्रक्रिया करून काढली दीड तोळ्याची अंगठी





**नांदगाव ।** तालुक्यातील जातेगाव येथील प्रगतिशील शेतकरी प्रकाश शिंदे यांच्या राजा नावाच्या दहा वर्ष वयाच्या बैलाच्या पोटाची शस्त्रक्रिया करून दीड तोळा वजन असलेली १ लाख ५५ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी काढण्यात आली.

नांदगाव तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी प्रकाश शिंदे यांच्याकडे सर्जा राजा नावाची बैल जोडी असून शुक्रवारी बैलपोळा सणाच्या निमित्ताने सकाळी त्यांना आंघोळ घालून रंगरंगोटी करून सजवून सायंकाळी प्रथेप्रमाणे मारुती मंदिरात देवदर्शन करून गावातील इतर बैलांच्या मिरवणुकीत सहभागी झाल्यानंतर सायंकाळी सहा वाजता आपल्या स्वतःच्या घरासमोर सर्जा राजाची औक्षण करून त्यांना नैवेद्य व सप्त धान्य खाण्यासाठी दिले. त्यानंतर शेजारीत राहत असलेले त्यांचे चुलत भाऊ विजय विठ्ठल शिंदे यांच्या घरी सात वाजेच्या दरम्यान सर्जा राजा औक्षण करण्यासाठी बोलविण्यात आली तेथे त्यांची पत्नी पार्वताबाई शिंदे यांनी सर्जा राजाची एक मोठ्या ताटामध्ये औक्षण करण्यासाठी पूजेसाठी लागणारे साहित्य नैवेद्य आणि त्यांच्या कपाळाला लावण्यासाठी हातातील दीड तोळ्याची सोन्याची अंगठी ठेवली होती. सर्जा राजाचे औक्षण झाल्यानंतर अंगठी उचलण्याचा विसर पडल्याने नैवेद्यावर ताव मारताना राजा नावाच्या बैलाच्या पोटातही अंगठी गेली. मात्र पार्वताबाई आणि त्यांचे पती विजय शिंदे यांना काही वेळाने अंगठीची आठवण झाल्यानंतर औक्षण केलेल्या ठिकाणासह शोधा सुरू झाली. शोधून आणखी सापडली नसल्याने सर्जा राजाची मालक प्रकाश शिंदे यांना याबाबत सांगितले मात्र सर्जा राजा पैकी कोणाच्या पोटात अंगठी गेली याबाबत शंका होती.

सदर घटनेबाबत नांदगाव येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. अनिल देवकर व डॉ.नवनाथ ताठे यांना हकिगत सांगितली असता त्यांनी दोन्ही बैलांना स्वच्छ व स्वतंत्र ठिकाणी बांधून ठेवून त्यांच्या विस्टेतून क्षणातून पडते की काय याकडे लक्ष ठेवण्यास सांगितले. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे रात्र उठून गेली. दुसऱ्या दिवशी सकाळी दोन्ही बैलांच्या विष्ठेतून अंगठी बाहेर पडली नसल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार शनिवार (दि.२३) रोजी दोन्ही बैलांना दिवसभर उपाशी ठेवण्यात आले. व सायंकाळी मेटल डिरेक्टर यंत्राच्या सहाय्याने सर्जा राजाची तपासणी करण्यात आली. यावेळी राजा नावाच्या बैलाच्या पोटात मेटलची वस्तू असल्याची निदर्शनास आल्यानंतर पशुधन विकास अधिकारी डॉक्टर अनिल देवकर व डॉ. नवनाथ ताठे, डॉ.विनोद राठोड, डॉ. धीरज कुमार यादव, डॉ.विशाल त्रिभुवन, डॉ. किरण वेळंचकर यांनी राजा नावाच्या बैलाची शस्त्रक्रिया करून बैलाच्या पोटातून दीड तोळा वजन असलेली सोन्याची अंगठी बाहेर काढण्यात आली.

# चारचाकी वाहनांसाठी नवीन मालिका

**नाशिक ।** प्रादेशिक परिवहन कार्यालय,नाशिक येथे चारचाकी वाहनांसाठी एमएच १५ केके ही नवीन मालिका काल (दि.२६) पासून सुरू करण्यात येत असल्याची माहिती सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी विलास चौधरी यांनी दिली.

तसेच राखून ठेवलेला पसंती क्रमांक कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्या व्यक्ती /संस्थेच्या नावे हस्तांतरित होणार नाही. भरलेले शासकीय शुल्क कुठल्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास अशा आकर्षक क्रमांकांची यादी कार्यालयातील नोटीस बोर्डावर त्याच दिवशी प्रदर्शित करण्यात येईल. ज्या अर्जदारांचा आकर्षक क्रमांक लिलाव प्रक्रियेसाठी समाविष्ट असेल अशा अर्जदारांनी लिलावामध्ये भाग घेण्यासाठी कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी (दि.२८) दुपारी ४ वाजेपर्यंत पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी विहित केलेल्या शुल्काच्या रकमेच्या डिमांड ड्राफ्टव्यतिरिक्त कोणत्याही बोलीच्या रकमेचा एकच डिमांड ड्राफ्ट बंद लिफाफ्यात सादर करावा.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्याची मुलगी अमेरिकेत यशाच्या शिखरावर!

**(अमृत पवार यांजकडून)**

**सप्तशृंग गड ।** प.पू.ओम दत्त श्री ठाकूर महाराज माध्यमिक विद्यालय श्रीसप्तशृंगीगड येथील शिपाई या पदावर कार्यरत असलेले कैलास गवळी यांना निर्भय प्रतिष्ठान ट्रस्ट मुंबई या संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षकेतर गुणगौरव पुरस्कार २०२५ जाहीर झाला. शैक्षणिक क्षेत्रात ते करीत असलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. शिक्षक दिनाचे औचित्य साधून त्यांच्या कार्याला गती आणि कामासाठी प्रोत्साहन मिळेल अशा अपेक्षेने हा पुरस्कार त्यांना मिळालेला आहे. ते आपले काम निष्ठेने करत असल्याने त्यांची मुलगी ऋतुजा गवळी एका साध्या मराठी कुटुंबातील मुलीने अपार संघर्षातून मिळवलेलं आंतरराष्ट्रीय यश आज साऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. कधी कधी सामान्य वाटणाऱ्या वाटा असामान्य ठरतात. संघर्षाच्या सावल्या जितक्या गडद, तितकाच तेजस्वी असतो यशाचा प्रकाश. अशाच एका संघर्षमय पण तेजस्वी प्रवासाची कहाणी आपल्या समोर आहे. प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्या एका गरीब पण कष्टकरी आदर्श शिक्षकेतर व्यक्तीची मुलगी, जी थेट अमेरिकेतील बोस्टन येथील क्लर्क विद्यापीठमध्ये शिकली आणि आता ती




मोठ्या पगाराच्या नोकरीवर कार्यरत आहे. हे यश सहज साध्य झालेलं नाही. ही कहाणी आहे एका मुलीची, जिने प्रतिकूलतेवर मात करत आपल्या स्वप्नांना आकाशाचे पंख दिले. घरात आर्थिक ताण, वडिलांची अल्प वेतनाची नोकरी, शिक्षणासाठी ४० लाखांचे शिक्षण कर्ज, हे सर्व असूनही तिने हार मानली नाही. ती लढली अपार मेहनतीने, चिकाटीने आणि आत्मविश्वासाने. तिच्या शिक्षणासाठी घेतलेलं तब्बल ८० लाख रुपयांचं एज्युकेशन लोन, आर्थिक अडचणी, मर्यादित सोयीसुविधा यांवर मात करत तिने आपले स्वप्न उंच भरारीसाठी सजवले. आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर तिने हे कठीण स्वप्न साकार केलं. क्लर्क विद्यापीठ ही अमेरिका आणि जगभरात एक प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था मानली जाते. अशा संस्थेत प्रवेश मिळवणं हीच मोठी गोष्ट, पण त्या संधीचं सोनं करत तिने केवळ शिक्षण घेतलं नाही तर आता तिला एका नामांकित कंपनीत उत्तम पगाराची नोकरी मिळाली आहे. या यशामागे तिच्या आई वडिलांचे कष्ट, घरच्यांचा पाठिंबा आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन आहे. ती जिथे उभी आहे, ते तिच्या सर्व कुटुंबाच्या त्यागाचं फलित आहे. यशाच्या शिखरावर पोहोचूनही तिने आपल्या मूळ गावाशी, शाळेशी आणि संस्कृतीशी नातं जपलेलं आहे. तिच्या या प्रवासातून आजच्या पिढीने शिकण्यासारखं खूप आहे. आर्थिक परिस्थिती कितीही बिकट असली, तरी जर आत्मविश्वास आणि मेहनत असेल,तर जगाच्या पाठीवर कुठेही पोहोचता येतं. ही कन्या आज आपल्या कर्तृत्वाने साऱ्या समाजासाठी दीपस्तंभ ठरली आहे. तिच्या यशाचा गौरव करण्यासाठी व तिच्या आदर्श वडिलांचा तसेच तिच्या कुटुंबीयांचा सन्मान प.पू .ओम दत्त ठाकूर महाराज माध्यमिक विद्यालय श्रीसप्तशृंगीगडचे मुख्याध्यापक शशिकांत देसले यांनी व स्टाफ ने केला. हा फक्त एका विद्यार्थिनीचा विजय नाही, तर तो आहे मेहनतीचा, शिक्षणाचा आणि संस्कारांचा विजय. नामांकित जागतिक विद्यापीठात प्रवेश मिळवणे हे स्वप्न असते अनेकांसाठी. पण या विद्यार्थिनीने फक्त प्रवेशच नाही घेतला, तर तिथे आपले ज्ञान, कौशल्य आणि मूल्यांमुळे स्वतःची ओळख निर्माण केली. तिच्या प्रवासात आर्थिक गरिबी होती, पण बुद्धीची श्रीमंती होती. तिच्या पाठीशी वडिलांचे कष्ट, आईचे आशीर्वाद,आजी आजोबांचे आशीर्वाद, कुटुंबाची प्रेरणा आणि गुरूजनांचे मार्गदर्शन होते. कैलास गवळी यांना मिळालेला हा पुरस्कार ठाकूर महाराज माध्यमिक विद्यालयासाठी एक मानाचा सन्मान आहे अशी प्रतिक्रिया सर्व स्टाफने दिली.

# महासागर



## गडचिरोली जिल्हा वर्धापन दिन विशेष

# गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती



गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ आगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून झाली. संपूर्ण गडचिरोली जिल्हा हा पूर्वी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये समाविष्ट होता व मुख्यतः गडचिरोली, सिरोंचा ही ठिकाणे चंद्रपूर जिल्ह्यामध्ये तहसील म्हणून कार्यरत होती. गडचिरोली जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ १४४१२ चौ. कि. मी. आहे.

चंद्रपूर व ब्रम्हपुरी मधील जमिनदारी व मालमत्तेचे हस्तांतरण, करून गडचिरोली तहसील म्हणून १९०५ पासून अस्तित्वात होती. ब्रम्हपुरी ऐवजी गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ आगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून करण्यात आली आहे.

गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्र, राज्याच्या विदर्भ या प्रदेशात मोडतो. फार प्राचीन काळी ह्या प्रदेशावर राष्ट्रकुट यांचे राज्य होते. त्यानंतर चालुक्य, देवगीरीचे यादव यांचे साम्राज्य होते. यानंतर गडचिरोलीच्या गोंड राजांनी राज्य केले. तेराव्या शतकात, खन्डक्या बल्लाळशाह यांनी चंद्रपूरची स्थापना केली. त्यांनी आपली राजधानी सिरपूर येथून चंद्रपूर येथे हलविली.

याचकाळात चंद्रपूर प्रदेश हा मराठ्याच्या सत्तेखाली आला. १८५३ मध्ये, बेरार हा चंद्रपूर (पूवीर्चे चांदा) प्रदेशाचा भाग ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आला. १८५४ मध्ये चंद्रपूर हा बेरार या प्रदेशाचा स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. ब्रिटीशांनी १९०५ मध्ये चंद्रपूर व ब्रम्हपुरीची जमिनदारी व मालमत्ता हस्तांतरण करून गडचिरोली तहसीलची निर्मिती केली.

राज्याची पुनर्रचना होण्यापुर्वी हा भाग १९५६ पर्यंत केंद्रीय अधिपत्याखाली होता. त्यानंतर राज्यपुनर्रचनेनुसार चंद्रपूर बॉम्बे स्टेट मध्ये समाविष्ट करण्यात आले. १९६० मध्ये केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याची स्थापना करून त्यामध्ये चंद्रपूर हा जिल्हा म्हणून समाविष्ट केला. १९८२ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून ब्रम्हपुरी ऐवजी स्वतंत्र गडचिरोली जिल्हा अस्तित्वात आला.

गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या उत्तर-पूर्व दिशेला वसलेला असून तेलंगणा व छत्तीसगड राज्याच्या सीमा लागून आहेत. गडचिरोली जिल्हा हा पूर्णपणे नक्षल प्रभावित जिल्हा म्हणून ओळखला जातो. गडचिरोली जिल्हा जवळपास ७६ टक्के जंगलाने व्यापलेला असल्याने घनदाट जंगलात नक्षल समर्थित लोक आश्रय घेतात.

गडचिरोली जिल्हा हा मुख्यत्वे महाराष्ट्र राज्यात आदिवासी, मागासलेला व घनदाट जंगलाने व्याप्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा अतिदुर्गम, डोंगर दऱ्याने व्याप्त व अविकसित असून जास्तीत जास्त क्षेत्र जंगलाने वेढलेला आहे.

हा जिल्हा बांबुचे झाड व तेंदूच्या पानाकरीता प्रसिध्द आहे. जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. धान हे जिल्ह्याचे मुख्य पिक आहे. याव्यतिरिक्त तूर, गहू, ज्वारी, सोयाबीन, जवस इत्यादी कृषी उत्पादने घेतली जातात. जिल्ह्यात चामोर्शी तालुक्यामध्ये आष्टी येथे पेपर मिलचा कारखाना होता. कालांतराने तो बंद पडला. सुरजागड येथे लोहखनीज उत्खनन केले जाते.

इतर कोणतेही मोठे उद्योगधंदे नाहीत. यामुळे हा जिल्हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. जिल्ह्यात धानाचे उत्पादन जास्त होत असल्याने धानगिरणीची संख्या जास्त आहे. जिल्ह्यात कोसाचे उत्पादन होत असून कोसा उत्पादन केंद्र आरमोरी येथे आहे. जिल्ह्यात फक्त १८. ५ कि. मी. लांबीचा रेल्वे मार्ग असून देसाईगंज येथे रेल्वेची सुविधा आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये मुख्यतः गोंडी, माडिया, मराठी, हिंदी, तेलगु, बंगाली, छत्तीसगडी इत्यादी भाषा बोलल्या जातात. गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासनाने प्रशासकीयदृष्ट्या गडचिरोली, देसाईगंज, अहेरी, चामोर्शी, एटापल्ली, कुरखेडा असे सहा उपविभाग निर्माण केले असुन प्रत्येक उपविभागात दोन तालुके सामाविष्ट करण्यात आले आहेत.

जिल्ह्यात एकूण १२ तालुके आहेत. जिल्ह्यात ४५७ ग्रामपंचायती असून १६८८ राजस्व गावे अस्तित्वात आहेत. जिल्ह्यामध्ये तीन विधानसभा व चंद्रपूर जिल्ह्याचा काही भाग मिळून एक लोकसभा क्षेत्र आहे. १२ पंचायत समीती आहेत. जिल्ह्यात ९ नगर पंचायती असून गडचिरोली, देसाईगंज (वडसा) व आरमोरी या शहरात नगरपालिका आहेत.

गोदावरी नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत असून तिचे पात्र जिल्ह्याच्या सीमेला लागून असून दक्षिण भागाला जिल्हा वसलेला आहे. गोदावरी नदीच्या उपनद्या जसे प्राणहिता (वैनगंगा व वर्धा या उपनद्या मिळून) व इंद्रावती या मुख्य नद्या जिल्ह्याच्या सीमाभागात वाहतात.

जिल्ह्याच्या भामरागड, टिपागड, पलसगड व सुरजागड भागात उंच टेकड्या आहेत. विदर्भाची काशी म्हणुन ओळखल्या जाणारे मार्कं डा देव येथील मंदीर चामोर्शी तालुक्यात वैनगंगेच्या काठावर वसले आहे. जिल्ह्यास वैभवशाली परंपरा लाभली आहे. जिल्ह्यातील वैभवशाली परंपरेचे जतन होणे आवश्यक आहे.

# जिल्ह्याला पर्यटन क्षेत्रात वाव मात्र, ४३ वर्ष होऊनही विकासात मागे!

२६ ऑगष्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती झाली. स्वंतत्र जिल्हा निर्माण होऊन ४३ वर्ष पूर्ण झाले असून सुध्दा जिल्हा पर्यटन विकास आराखड्याअभावी जिल्ह्यात पर्यटन क्षेत्रात वाव असताना सुध्दा जिल्ह्याकडे पर्यटक आकर्षित होऊ शकले नाही, ही वास्तविकता आहे.

जिल्ह्यातील बाराही तालुक्यातील पर्यटन स्थळावर पर्यटकांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोईसुविधा उपलब्ध नाही याकडे लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षिततेमुळे पर्यटनाचा विकास होऊ शकला नाही त्यामुळे देश विदेशातील पर्यटक या स्थळाकडे पाट फिरवली आहे.

सरकारने शासनाच्या पर्यटन धोरण असताना जिल्ह्यातील बाराही तालुक्यातील पर्यटन स्थळावर जिल्हा प्रशासनाने पर्यटन विकास आराखड्यात पायाभूत सुविधा, इको टुरिझम जंगल सफारीसारखे विविध उपक्रम, जिल्ह्याची माहिती पुस्तिका टुरिस्ट गाईड, पर्यटकांना निवासाची चांगली सुविधा, दळणवळणाच्या सोयी सुविधा, इत्यादी पायाभूत सुविधा समाविष्ट करण्याची गरज होती. मात्र तसे नियोजन केल्याचे दिसत नाही.

त्यामुळे जिल्हा पर्यटन विकास होऊ शकले नाही हे वास्तव आहे. त्याकडे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी पाठ फिरवली हेही वास्तव आहे त्यासाठी आतातरी जिल्ह्यातील लोकप्रतनिधीं, व जिल्हा प्रशासना कडून पर्यटन जिल्हा करण्यासाठी प्रयत्न करावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**चामोर्शी तालुका :-** तालुका मुख्यालयापासून अगदी जवळ असलेल्या मार्कंडा देव या स्थळी वैनगंगा नदीच्या तीरावर वसलेले मार्कंडेश्वर शिव मंदिर विदर्भाची काशी म्हणून ओळखल्या जात असून, या ठिकाणी उत्तर वहिनी असल्याने या स्थळाला धार्मिक महत्व आहे. महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. या ठिकाणी राज्यातून व बाहेर राज्यातून भाविक मोठ्या संख्येने येतात मात्र येथेही अद्याप आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध नाहीत.

**चपराळा अभयारण्य:-** याच तालुक्यात आलापल्ली ते आष्टी मार्गावर चौडमपल्ली पासून ०६ कि.मी. अंतरावर वैनगंगा व वर्धा नदीच्या संगम तीरावर सुप्रसिध्द चपराळा देवस्थान असून हे देवस्थान चपराळा अभयारण्यांतर्गत येते. येथेही महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते.

**आरमोरी तालुका:-** तालुक्यातील वैरागड येथे प्रसिद्ध प्राचीन किल्ला असून नांगवंशिय माना राजाच्या राजवटीचा तो ऐक अवशेष आहे वैरागड गावाच्या पूर्वेस १० एकर जागेत हा किल्ला आहे.

**कोरची तालुका:-** तालुक्यात सावरगाव - कोटगुलच्या मध्ये निहाकल या छोट्याशा गावाजवळ उंच टेकडीवरील पठारावर टीपागड किल्ला असून हा किल्ला तत्कालीन राजा पूरमशहा यांनी निर्माण केला आहे.

**सिरोंचा तालुका (सोमनुर त्रिवेणी संगम) :**

सिरोंच्या पासून ४० कि. मी. व असरल्लीपासून पूर्वेस १० कि. मी अंतरावर महाराष्ट्र, आंध्रप्रदेश सिमेवर गोदावरी इंद्रावती नदीच्या काठावर सोमनुरला लागून देखणा व निसर्गरम्य त्रिवेणी संगम असून, जिथे संगम होता तिथे सदावती नदी गुप्त रुपात असल्याने या संगमाला त्रिवेणी संगम म्हणतात.

**कालेश्वर देवालय :-** सिरोंचा पासून १० कि. मी. अंतरावर असलेल्या आध्रप्रदेशातील आदिलाबाद जिल्ह्यात गोदावरी नदीच्या तीरावर वसलेले कालेश्वर देवालय आहे

**अहेरी तालुका**
**(वनवैभव - ग्लोरी ऑफ फॉरेस्ट) :**
तालुक्यातील आलापल्ली येथून १६ कि.मी. अंतरावर राम लक्मन नावाच्या सागवानाची जोडी होती ती आजही आहे. हा ३५ मिटर उंचीचा सागवान सर्वांच्या कुतूहलाचा, आकर्षणाचा विषय ठरला आहे.

**नैसर्गिक खुले रंगमंच बोगम दान परपू :** अहेरी तालुक्यात आणखी एक महत्वाचे स्थळ म्हणजे महाभारतकालीन नैसर्गिक खुले रंगमंच बोगम दान परपु होय. पांडवाचे वास्तव लक्खामेंडा येथे असताना ते आपल्या मनोरंजनासाठी या खुल्या रंगमंचावर येत असत.

**भामरागड तालुका (बिनागुंडा) :**
अतीदुर्गम आणि नैसर्गिक सृष्टी सौंदयाने नटलेल्या भामरागड तालुक्यात अगदी पूर्वेला सुमारे ४० कि.मी. अंतरावर बिनागुंडा प्रेशकणीय स्थळ असून येथील नाले बाराही महिने वाहतात. त्यामुळे डोंगर पठारावर नेहमी हिरवेगार दृष्य असते. तेथे ऐक धबधबा असून त्याला इंद्रसकाळ असे म्हणतात.





**हेमलकसा प्राणी संग्रालय :** आदिवासीं बहुल भामरागड तालुक्यात बाबुळ, पर्णकोटा, बंडीया, व गोंडशी या चार नध्याचा विस्तीर्ण संगमामुळे या परिसरात हिरव्यागार वृक्षवेलींनी घनदाट जंगल परिसर विलोभनीय असून, याच ठिकाणी मानव कल्याणासाठी काम करणारे बाबा आमटे यांचा वसा त्यांचे सुपुत्र डॉ. प्रकाश आमटे यांनी तेथे नंदनवन फुलवून आदिवासींची सेवा करत आहेत.

**एटापल्ली तालुका (सूरजागड किल्ला) :**
अतिदुर्गम अशा एटापल्ली तालुक्यात सुरजागड प्रसिध्द किल्ला आहे सूरजागड टेकड्या या सातपुड्याच्या रांगा असून त्या समुद्र सपाटीपासून २ हजार कि. मी अंतरावर आहेत छत्तीसगड राज्यातील याच टेकड्यातून पर्लकोटा, पामुलगौतम, इंद्रावती, या नद्या उंगम पावतात. ऐटापल्ली पासून १६ कि. मी अंतरावर सूरजगड हे लोहयुक्त पहाड असून, याचं पहाडावर ऐतिहासिक किल्ला आहे.

**धानोरा तालुका (भोवरागड) :**
तालुक्यापासून ४ कि.मी. अंतरावर असलेल्या भोवरागड स्थळावर दरवर्षी रंगपंचमीच्या पहिल्या आठवड्यात यात्रा भरते याच ठिकाणी महादेवाची शिवलिंग आहे हे प्रेक्षणीय स्थळ आहे

**कुरखेडा तालुका, (खोब्रामेंढा) :**
कुरखेडा ते धानोरा मार्गावर मालेवांडा गावापासून ईशान्येला १० ते १५ की.मी. अंतरावर खोब्रागड देवस्थान व जागृत हनुमान देवस्थान असून मंदिराच्या पूर्वेस डोंगर त्या डोंगरावर पठार असून त्या पठारावर अर्धवट किल्ला आहे.

**अरततोंडी शिवलिंग मंदिर:**
कुरखेडा तालुक्यात गुरनोली या पोच मागार्पासून २ की.मी. अंतरावर अरततोंडी हे देवस्थान असून तेथे महादेवाचे शिवलिंग आहे येथे महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते.

**देसाईगंज तालुका (आमगाव बुट्टी) :**
देसाईगंज लाखांदूर या राज्य मार्गावर २किमी अंतरावर आमगाव बुट्टी हे ऐक अविस्मरणीय पर्यटन स्थळ आहे. गावाच्या मध्यभागी तलाव आहे.

**गडचिरोली तालुका (सेमाना देवस्थान) :**
जिल्हा मुख्यालयापासून चामोर्शी मार्गावर अवघ्या ४ कि.मी. अंतरावर प्रसिद्ध सेमाणा देवस्थान आहे. या ठिकाणी हनुमानाचे भव्य मंदिर असून राम सीता लक्ष्मण यांचेही मंदिर आहे या ठिकाणी दर शनिवारी, सोमवारला या परिसरातील भाविक मोठ्या संख्येने गर्दी करतात.

**मुलचेरा तालुका**
**(राजा रामजी गेडाम ऐतिहासिक स्थळ) :-**
तालुका मुख्यालयापासून १२ कि.मी. अंतरावर असलेल्या पहाडावर इंग्रजकाळीन रामजी गेडाम नामक राजा राहत होता. या ठिकाणी मोठी गुफा असून सभोवताल खाडी आहे तेथे जाण्यासाठी ऐकच रस्ता असून पहाडावर पूर्वी बंदूक गाडलेल्या अवस्थेत होती ती बंदूक आता नष्ट झाली असल्याचे जाणकारांकडून समजले. पुरातन काळात इंग्रजांकडून आक्रमण झाले त्यावेळी राजा रामजी गेडाम पहाडावर असलेल्या गुप्त गुहेतून पलायन केले असा इतिहास आहे.

जिल्ह्यातील बाराही तालुक्यात ऐतिहासिक व घनदाट जंगलसृष्टी सौंदर्य निसगार्ने भरभरून दिले असल्याने या नैसर्गिक सौंदर्यामुळे या जिल्ह्याची ओळख आहे मात्र गेल्या ४२ वर्षात पर्यटन जिल्हा होऊ शकला नाही. त्या बारा तालुक्यात आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध केले नाही त्यासाठी जिल्ह्यातील बाराही तालुक्यातील स्थळाचा विकास होणे गरजेचे आहे. तरच जिल्ह्याची ओळख निर्माण होईल.

# चपराळा वन्यजीव अभयारण्य

महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यात वसलेले चपराळा वन्यजीव अभयारण्य हे निसर्ग आणि वन्यजीव प्रेमींसाठी स्वर्ग आहे. १९८६ मध्ये स्थापन झालेल्या या अभयारण्याचे क्षेत्रफळ सुमारे १३४.७८ चौरस किलोमीटर आहे. येथे दुर्मिळ आणि संकटग्रस्त प्रजातींचे संरक्षण केले जाते, त्यामुळे हे एक महत्त्वाचे जैवविविधता केंद्र मानले जाते.

घनदाट जंगल, समृद्ध वनस्पती आणि अद्वितीय वन्यजीवांचा अधिवास असलेले हे अभयारण्य पर्यटकांना निसर्गाच्या सान्निध्यात रमण्याची अनोखी संधी देते. येथे शांत आणि निसर्गरम्य वातावरण असल्यामुळे, निसर्गसंपत्तीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी हे ठिकाण अत्यंत आकर्षक आणि अनिवार्य आहे!

चपराळा वन्यजीव अभयारण्याचा भूभाग प्रामुख्याने दक्षिणी उष्णकटिबंधीय कोरड्या पानगळी जंगलांनी व्यापलेला आहे. या जंगलांमध्ये गवताळ क्षेत्रे मिश्रित असल्यामुळे येथे विविध प्रकारच्या वन्यजीवांसाठी आदर्श अधिवास निर्माण झाला आहे. अभयारण्याच्या पश्चिम सीमेवर प्रवाहित होणारी प्राणहिता नदी ही येथील प्राण्यांसाठी जीवनरेखा आहे. या नदीमुळे परिसराच्या पर्यावरणीय समृद्धीला चालना मिळते आणि जैवविविधता अधिक वाढते. मुर्गिकुंटा, रायकोंटा आणि कोमातकुंटा यांसारख्या जलाशयांचे अस्तित्वही आढळते. कोरड्या जंगलांचा विस्तार आणि मुबलक पाण्याच्या स्त्रोतांचा संगम या ठिकाणी विविध वनस्पती आणि प्राण्यांसाठी पोषक वातावरण निर्माण करतो. त्यामुळे, चपराळा अभयारण्य हे जैवविविधतेने समृद्ध असलेले एक महत्त्वाचे निसर्गसंपन्न ठिकाण आहे. जिथे वन्यजीवांना नैसर्गिकरित्या भरभराटीची संधी मिळते.

चपराळा वन्यजीव अभयारण्य समृद्ध आणि वैविध्यपूर्ण वनस्पतींसाठी प्रसिद्ध आहे. जी येथील परिसंस्थेचा मुख्य आधार आहे. येथे सागवान, अर्जुन, सालई, महुआ, बेल, धावडा, तेंदू, शिसव आणि सेमल यांसारख्या महत्त्वाच्या वृक्षप्रजाती मोठ्या प्रमाणावर आढळतात. ही झाडे विविध वन्यप्राण्यांसाठी निवास आणि अन्नाचा मुख्य स्त्रोत आहेत. याशिवाय, जंगलात घनदाट झुडपे आणि गवताळ प्रदेशही मोठ्या प्रमाणावर आढळतात. जे शाकाहारी प्राण्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. हिरवाईने नटलेले हे जंगल आणि विविध प्रकारच्या झाडांचे मिश्रण चपराळाला समृद्ध नैसर्गिक अधिवास बनवते, जिथे असंख्य वन्यजीव प्रजाती निर्भयपणे वाढू आणि फुलू शकतात.

चपराळा अभयारण्यातील ही विपुल वनसंपदा येथील जैवविविधतेचे संरक्षण करण्यास मदत करते आणि संपूर्ण पर्यावरणीय साखळी सुदृढ ठेवते. त्यामुळे, हे अभयारण्य वनस्पती आणि वन्यजीवांसाठी एक महत्त्वाचे नैसर्गिक केंद्र मानले जाते.

चपराळा वन्यजीव अभयारण्य सुमारे १३१ प्रकारच्या वन्यप्राण्यांचे आश्रयस्थान आहे, त्यामुळे हे जैवविविधतेसाठी



एक महत्त्वाचे केंद्र मानले जाते. येथे अनेक भक्षक आणि शाकाहारी प्राणी मुक्तपणे संचार करताना पाहायला मिळतात. बंगालचा वाघ, चपळ बिबट्या, दुर्मिळ जंगली मांजर आणि स्लॉथ बेअर (अस्वल) हे येथील प्रमुख सस्तन प्राणी आहेत. याशिवाय, रानकुत्रे आणि कोल्हे हे शिकारी प्राणीही येथे आढळतात. अभयारण्यात सांबर, चितळ, भेकर, नीलगाय आणि रानडुक्कर यांसारखे शाकाहारी प्राणीही मोठ्या प्रमाणावर दिसतात. विशेषतः, उडणारी खार जी आपल्या अद्वितीय उडण्याच्या क्षमतेमुळे पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरते.

इतक्या विविध प्राण्यांच्या अस्तित्वामुळे चपराळा अभयारण्याचे पर्यावरण संतुलित आणि संपन्न राहते. हे अभयारण्य जैवविविधतेच्या संवर्धनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे आणि येथे निसर्गाचा समतोल राखणारी एक स्वतंत्र, स्वयंपूर्ण परिसंस्था अस्तित्वात आहे.

चपराळा वन्यजीव अभयारण्य हे पक्षीप्रेमींसाठी एक खरे स्वर्ग आहे, कारण येथे सुमारे १३१ प्रजातींचे पक्षी आढळतात. निसर्गाच्या कुशीत रमलेल्या या अभयारण्यात रंगीबेरंगी मोर त्यांच्या मोहक पिसा?यांनी जंगलाचे सौंदर्य वाढवतात, तर जंगली कोंबड्यांचे सूर संपूर्ण परिसर अधिक जिवंत करतात.

येथे केवळ स्थानिक पक्ष्यांचेच वास्तव्य नसून, हंगामी स्थलांतरित पक्ष्यांचीही मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. त्यामुळे प्रत्येक ऋतूमध्ये हे अभयारण्य वेगवेगळ्या नयनरम्य पक्ष्यांच्या संगमाने नटलेले असते.

या समृद्ध पक्षीवैविध्यामुळे चपराळा हे पक्षीनिरीक्षक आणि वन्यजीव छायाचित्रकारांसाठी एक अत्यंत आकर्षक ठिकाण ठरते.

इतक्या विविध पक्ष्यांच्या उपस्थितीमुळे अभयारण्याचा जैविक समतोल अधिक सुदृढ राहतो आणि संपूर्ण परिसंस्थेला एक अद्वितीय निसर्गसौंदर्य प्राप्त होते. चपराळा अभयारण्यात पक्षी निरीक्षणाचा अनोखा आणि संस्मरणीय अनुभव नक्कीच घेण्यासारखा आहे!

■ ■ ■

# गडचिरोली : संघर्षातून समृद्धीकडे

**(लेखाचा उर्वरीत भाग)**

**पर्यटन, कृषी व हरित विकास :** गडचिरोली केवळ उद्योगावरच नव्हे, तर पर्यटनावरही पुढे जाणार आहे. वैनगंगा, इंद्रावती, प्राणहिता अशा नद्या, धबधबे, कोलमार्का अभयारण्य या नैसर्गिक सौंदर्यस्थळांसह ऐतिहासिक आणि वास्तुशिल्पासाठी प्रसिद्ध मार्कंडा मंदिर, वैरागड किल्ला यांसारखी वारसास्थळे जिल्ह्याला पर्यटननगरी बनवतील. पर्यटनातील गुंतवणूक आणि सार्वजनिक वाहतूक सुधारून ही स्थळे अधिक सहज उपलब्ध होतील.

कृषी क्षेत्रात बहुपीक पद्धती, १०० टक्के सेंद्रिय तालुका, तेंदूपत्ता, बांबू व महुआसारख्या वनोपजांवर प्रक्रिया केंद्र व बाजारपेठ निर्माण हाही विकासाचा महत्त्वाचा भाग राहणार आहे. जिल्ह्यातील एक कोटी वृक्ष लागवडीचा उपक्रम भारताचा हरित जिल्हा बनवण्यासाठी एक पाऊल ठरतो.



**नक्षलमुक्त गडचिरोली: आत्मविश्वासाचा नवा अध्याय**

कमी वेळेतही सर्वाधिक मतदानातून संविधानावर विश्वास दर्शविणारा गडचिरोली हा आदिवासी बहुल जिल्हा, निसगार्शी एकरूप होऊन राहणे हीच येथील संस्कृती. मात्र छत्तीसगड व तेलंगणा सिमेवरील जंगल आणि दुर्गम भागात जोरजबरदस्तीने येथील नागरिकांना नक्षलभरतीत ओढून घेण्यात येत होते.

शासनाने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित केले. जिल्हा व पोलीस प्रशासनाने दुर्गम व नक्षलग्रस्त भागात शासकीय योजनांचा लाभ पोहचवून नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी नुकतेच नक्षल्यांच्या बालेकिल्ला असलेल्या भागात छत्तीसगड सीमेवरील कवंडे या गावात नागरिकांशी संवाद साधत शासकीय योजनांचे लाभ वितरित केले. त्यांची उपस्थिती नक्षल विरोधात नागरिकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारी ठरली.

शासनाच्या अथक प्रयत्नांमुळे २०२२ पासून आजपर्यंत १,६५८ माओवादी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात आले आहेत. प्रशासनाने २०२६ पर्यंत गडचिरोलीला पूर्णतः नक्षलवादमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. शांतीच्या या वातावरणामुळे भविष्यात उद्योग, शेती, पर्यटन आणि समाजकारण या सर्वच क्षेत्रांत गडचिरोलीची नवी ओळख घडेल.

**समृद्धीकडे वाटचाल :** गडचिरोली जिल्ह्याचा प्रवास हा संघर्षातून उभारी घेणाऱ्या समाजाचा प्रतीक आहे. मागास जिल्हा ही ओळख पुसून ग्रीन स्टील सिटी ही नवी ओळख निर्माण होते आहे. उद्योग, शिक्षण, पर्यावरण आणि पर्यटनाच्या एकत्रित विकासातून गडचिरोली आत्मनिर्भर, आत्मविश्वासू आणि प्रगतिशील जिल्हा बनत आहे, हीच गडचिरोलीची नवी ओळख आहे.

**गजानन जाधव**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**गडचिरोली.**

■ ■ ■

# सरन्यायाधीश गवई यांच्या नेतृत्वाखालील न्यायवृदांने घेतलेल्या निर्णयावर न्या. नागरत्न यांचा आक्षेप

## न्या. पांचोलींच्या नियुक्तीवर दर्शवली असहमती

**नवी दिल्ली, दि. २६ वृत्तसंस्था**

पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश विपुल मनुभाई पांचोली यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती करण्याची शिफारस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने सोमवारी केंद्र सरकारला केली. मात्र हा निर्णय एकमताने घेण्यात आलेला नव्हता,

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंद (कॉलेजियम) मधील पाच न्यायाधीशांपैकी एक असलेल्या न्यायाधीश बी. व्ही. नागरत्न यांनी न्यायमूर्ती पांचोली यांच्या निवडीला विरोध केला असल्याची माहिती मिळत आहे. ज्येष्ठता आणि प्रादेशिक प्रतिनिधित्व यावर त्यांनी आक्षेप घेतल्याची माहिती मिळत आहे. उच्च न्यायालयाच्या ज्येष्ठतेच्या यादीत न्यायमूर्ती पांचोली यांचा सध्या ५७ वा क्रमांक लागत आहे.

न्यायवृंदामध्ये सरन्यायाधीश भूषण गवई यांच्याव्यतिरिक्त न्या. सूर्यकांत, न्या. विक्रम नाथ, न्या. जेके माहेश्वरी आणि न्या. नागरत्न यांचा समावेश आहे.

न्यायवृंदाने याआधी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश निवडताना सामान्यपणे तीन निकष समोर ठेवले होते. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि मुख्य न्यायाधीशांची अखिल भारतीय स्तरावरील ज्येष्ठता, प्रतिनिधित्वाचे तत्व, योग्यता आणि सचोटी हे निकष पाळले जात होते. भूतकाळात, उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी शिफारस करताना या निकषांचा संतुलित विचार केला जात होता.

विशेषतः सरन्यायाधीश होऊ शकणाऱ्या उमेदवारांच्या निवडीसाठी ज्येष्ठता हा निकष बाजूला ठेवला जात असे.

न्यायमूर्ती नागरत्न यांनी आक्षेप घेतल्यानुसार, सर्वोच्च न्यायालयात गुजरात उच्च न्यायालयाचे दोन न्यायाधीश आधीच आहेत. न्या. जेबी पारडीवाला आणि न्या. एनव्ही अंजारिया हे गुजरातच्या उच्च न्यायालयातून येतात. पांचोली यांची निवड झाल्यास गुजरात उच्च न्यायालयातून येणारे ते तिसरे न्यायाधीश ठरतील. पांचोली यांनी पाटणा उच्च न्यायालयाचा कार्यभार सांभाळण्यापूर्वी ते गुजरात उच्च न्यायालयात कार्यरत होते.

न्यायाधीश नागरत्न यांच्या पत्रानुसार, न्या. पांचोली यांची गुजरातहून पाटणा उच्च न्यायालयात केलेली बदली यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. अशाप्रकारची पावले उचलल्यास चुकीचे उदाहरण निर्माण केले जाऊ शकते. तसेच न्यायवृंदाच्या विश्वासार्हतेवर शंका निर्माण होऊ शकते.

न्यायमूर्ती पांचोली यांची सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती झाल्यास त्यांना सरन्यायाधीशपदी काम करण्याची संधी मिळू शकते. न्या. पारडीवाला हे २०२८ मध्ये दोन वर्षांसाठी आणि न्या. पांचोली हे २०३१ मध्ये सात महिन्यांसाठी सरन्यायाधीश होऊ शकतात.

मे महिन्यापर्यंत सर्वोच्च न्यायालयात गुजरात उच्च न्यायालयातील न्या. पारडीवाला, एमआर शाह आणि बेला त्रिवेदी या तीन न्यायाधीशांचा समावेश होता. शाह मे महिन्यात, तर बेला त्रिवेदी यांचा १६ मे हा कामाचा अखेरचा दिवस होता. यांच्याखेरीज मुंबई, अलाहाबाद, पंजाब व हरियाणा या उच्च न्यायालयातूनही प्रत्येकी तीन न्यायाधीशांचा सर्वोच्च न्यायालयात समावेश आहे.

# अतिवृष्टीमुळे जम्मूतील दोडा जिल्ह्यात हाहाकार

## ५ ठार; वैष्णोदेवी यात्रा स्थगित

**जम्मू, दि. २६ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरच्या दोडा जिल्ह्यात मुसळधार पाऊस, ढगफुटी आणि भूस्कलनामुळे किमान पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. दोडाचे उपायुक्त हरविंदर सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, घर कोसळून दोघांचा तर तर पूरामुळे दोन जणांचा मृत्यू झाला आहे. या भागातील अनेक घरे आणि रस्ते उध्वस्त झाले आहेत. प्रमुख नद्यांच्या पाणीपातळीत अचानक वाढ झाल्यामुळे अधिकाऱ्यांनी नदीकाठच्या रहिवाशांना तिथून दूर जाण्याचे आवाहन केले आहे. कटरा जवळील त्रिकुटा टेकड्यांवरील वैष्णोदेवी तीर्थयात्रा स्थगित केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

मुसळधार पावसामुळे रस्त्याचा मोठा भाग वाहून गेल्याने दोडा आणि किश्तवारला जोडणारा महत्त्वाचा दुवा असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्र. २४४ वरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. विविध ठिकाणी भूस्खलन झाल्यानंतर जम्मू-पूंछ महामार्गावरून वाहनांची वाहतूक रोखण्यात आली आहे.

दोडाचे उपायुक्त हरविंदर सिंग यांनी पुढे सांगितले की, दोडा-भादेरवाह, थाथरी-तांता आणि धारा-जई दरम्यानचे रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. मुसळधार पावसामुळे सतरा घरे आणि काही सरकारी मालमत्तेचेही नुकसान झाले आहे.






















# पाकिस्तानी गुप्तहेर 15 लष्करी आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या संपर्कात

**नवी दिल्ली, दि. २६ वृत्तसंस्था**

सीआरपीएफमधील सहायक उपनिरीक्षक मोती राम जाट याला तीन महिन्यांपूर्वी कथितपणे पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्याला संवेदनशिल गोपनीय माहिती पुरवल्याप्रकरणी दिल्लीतून अटक करण्यात आले होते. दरम्यान जाट याच्या संपर्कात असलेल्या पाकिस्तानी अधिकाऱ्याबद्दल धक्कादायक माहिती समोर आली आहे. तो पाकिस्तानी अधिकारी भारतीय लष्कर, अर्धसैनिक दल आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांशी संबंधित १५ फोन क्रमांकांच्या संपर्कात होता, अशी माहिती या प्रकरणाचा तपास करणाऱ्या केंद्रीय गुप्तचर संस्थांनी दिली आहे. जाट याला राष्ट्रीय तपास संस्थे (NIA) ने २७ मे रोजी अटक केले होते. तो पाकिस्तानी एजंट्सना गोपनीय माहिती पुरवत असल्याचे समोर आल्यानंतर त्याला चौकशीसाठी केंद्रीय तपास यंत्रणांना सोपवण्यता आले. जाट हा सीआरपीएफच्या बटालियनबरोबर पहलगाम येथे तैनात होता आणि २६ नागरिकांची हत्या करण्यात आलेला २२ एप्रिल रोजीचा दहशतवादी हल्ल्या होण्याच्या आधी अवघ्या ५ दिवसांपूर्वी त्याची बदली दिल्ली येथे झाली होती.

"टेक्निकल सर्व्हेलन्सच्या मदतीने गुप्तचर यंत्रणांनी शोधून काढले की सलीम अहमद नावाचा पाकिस्तानी ऑपरेटीव्ह फक्त जाट याच्याच संपर्कात नव्हता तर तो इतर किमान १५ फोन क्रमांकांच्या देखील संपर्कात होता. कॉल डिटेल रेकॉर्ड आणि इंटरनेट प्रोटोकॉल डिटेल रेकॉर्ड स्कॅन केल्यानंतर असे आढळून आले की, यापैकी चार क्रमांक लष्करातील कर्मचाऱ्यांचे आहेत, तर आणखी चार हे अर्धसैनिक दलातील कर्मचारी आणि उर्वरित सात क्रमांक हे केंद्र सराकराच्या वेगवेगळ्या विभागातील कर्मचाऱ्यांचे आहेत," असे सूत्रांनी सांगितले. सध्या केंद्रीय तपास यंत्रणा यांच्यात झालेले संवाद तपासण्यासाठी सर्व डाटाचे विश्लेषण करत आहेत असे सूत्रांनी सांगितले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गुप्तचर संस्थांना आढळून आले की जाट याच्याशी ज्या क्रमांकावरून संपर्क साधण्यात आला होता ते सिम कार्ड कोलकाता येथील एका व्यक्तीने मिळवले होते आणि त्याने नंबर सक्रिय करण्यासाठी आवश्यक असलेला ओटीपी लाहोर येथील पाकिस्तानी ऑपरेटिव्हशी शेअर केला होता. आत्तापर्यंत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार तपासात असेही आढळून आले आहे की दोन वर्षांपेक्षा जास्त काळ जाट याने कथितपणे अनेक संवेदनशिल कागदपत्रे लाहोर येथील हँडलरला पाठवले, ज्याच्या बदल्यात त्याला १२,००० रुपयांचे नियमित पेमेंट मिळत राहिले. हा पैसा जाट आणि त्याच्या पत्नीच्या वेगेगळ्या ठिकाणी असलेल्या बँक खात्यांमध्ये डिपॉझिट केली जात होती. ही खाती दिल्ली, महाराष्ट्र, हरियाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, आसाम आणि पश्चिम बंगाल अशा विविध ठिकाणी होती.







महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**